सांध्य दैनिक


# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ३०१ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## २१ महापालिकांमध्ये निवडणूक झाल्यावर RSS चे ‘व्यापक गृहसंपर्क अभियान’; १८ जानेवारीपासून सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ नागपुर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जन्मशताब्दी वर्षानिमित्त एक अनोखे असे ‘व्यापक गृहसंपर्क अभियान’ हाती घेतले आहे. त्या अंतर्गत हजारो स्वयंसेवक प्रत्येक घरी जाऊन संघकार्याची माहिती देत आहेत. सध्या ग्रामीण आणि अर्धनागरी शहरांमध्ये स्वयंसेवक घरोघरी जात आहेत आणि संघकार्याची महती सांगत आहेत.

संघ स्थापनेमागील उद्देश, संघाच्या कार्याचा विस्तार आज देशभरात कसा झाला आहे, कोणती सेवाकार्ये राबविली जात आहेत, पर्यावरण संरक्षण, याबाबतची माहिती असलेली पत्रके प्रत्येक घरात दिली. सोबतच स्वयंसेवक हे संघाबद्दल व्यक्तिश: माहितीही देत आहेत. मात्र, निवडणूक असलेल्या २९ पालिकांच्या शहरांमध्ये हे अभियान १८ जानेवारीपासून राबविले जाणार आहे. निवडणुकीच्या राजकारणापासून स्वत:ला दूर ठेवण्याची भूमिका या निमित्ताने संघाने घेतली आहे.

पालिकांच्या शहरांमध्येही अभियान राबविले असते तर यानिमित्ताने संघाकडून भाजपचा प्रचार केला जात असल्याची टीका झाली असती. संघाने या आरोपापासून स्वत:ला दूर ठेवले. संघाचे अनेक स्वयंसेवक हे भाजपचेही कार्यकर्ते आहेत आणि त्यांच्यावर अभियानाची जबाबदारी दिली असती तर त्याला अधिकच राजकीय रंग आला असता, ते संघाने टाळले आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाकडून निर्णय

### मागितलेला दिलासा न्यायनिर्णयासाठी योग्य नाही – न्यायालय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वतीने दरवर्षी अजमेर येथील अजमेर शरीफ दर्गा येथे चादर पाठवण्याची परंपरा ही भारतातील धार्मिक सौहार्द, सर्वधर्मसमभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून पाहिली जाते. ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्याला चादर अर्पण करणे ही केवळ धार्मिक श्रद्धेची बाब नसून, विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये सलोखा वाढवण्याचा संदेश देणारी कृती मानली जाते. मात्र, या परंपरेशी संबंधित काही बाबी घटनात्मक निकषांच्या दृष्टीने तपासल्या गेल्या असून, त्यावर सर्वोच्च न्यायालयासमोरही चर्चा झाली आहे. केंद्र सरकार व तिच्या यंत्रणांकडून इस्लामी विद्वान व सूफी संत ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती तसेच अजमेर येथील अजमेर शरीफ दर्गा यांना दिल्या जाणाऱ्या राज्यपुरस्कृत सन्मान व प्रतीकात्मक मान्यतेला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. या याचिकेत पंतप्रधानांना अजमेर शरीफला चादर अर्पण करण्यास मनाई करण्याचीही मागणी करण्यात आली होती.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने ही याचिका नामंजूर करताना, मागितलेला दिलासा न्यायनिर्णयासाठी योग्य नाही, असे स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी दर्ग्यात चादर अर्पण करण्याची प्रथा १९४७ नंतर सुरू झाल्याचा दावा केला. मात्र, सरन्यायाधीशांनी या मुद्द्यावर कोणतेही भाष्य करणे टाळत, हा विषय न्यायालयीन



हस्तक्षेपाच्या कक्षेत येत नसल्याचे नमूद केले.

यानंतर वकिलांनी दर्गा शंकराच्या मंदिराच्या अवशेषांवर उभारल्याचा दावा करणारा दिवाणी दावा अद्याप खालच्या न्यायालयात प्रलंबित असल्याकडे लक्ष वेधले. यावर खंडपीठाने स्पष्ट केले की, सध्याच्या रिट याचिकेची फेटाळणी त्या प्रलंबित दिवाणी दाव्यावर कोणताही परिणाम करणार नाही.

ही याचिका जितेंद्र सिंग (विश्व वैदिक सनातन संघ) आणि विष्णू गुप्ता (हिंदू सेना) या दोघांनी दाखल केली होती. केंद्र सरकारच्या विविध यंत्रणांकडून ख्वाजा मोइनुद्दीन चिश्ती यांना दिला जाणारा राज्यपुरस्कृत औपचारिक सन्मान, अधिकृत आश्रय आणि प्रतीकात्मक मान्यता घटनाबाह्य, मनमानी, ऐतिहासिकदृष्ट्या असमर्थित आणि भारतीय प्रजासत्ताकाच्या घटनात्मक मूल्यांशी विसंगत असल्याचा त्यांचा आक्षेप होता.

पंतप्रधानांकडून अजमेर शरीफला चादर अर्पण करण्यास मनाई करण्याच्या मागणीसंदर्भात, ही प्रथा १९४७ मध्ये जवाहरलाल नेहरू यांनी सुरू केल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला असून, त्याला कोणताही कायदेशीर किंवा घटनात्मक आधार नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच दर्गा समिती, अजमेर वि. सय्यद हुसेन अली या संविधानपीठाच्या निर्णयाचा हवाला देत, अजमेर दर्गा हा राज्यघटनेच्या अनुच्छेद २६ अंतर्गत ‘धार्मिक संप्रदाय’ ठरत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. सरकारप्रमुखांनी दर्ग्यात चादर अर्पण करणे हे जनतेच्या इच्छेविरुद्ध असल्याचाही दावा करण्यात आला.

उल्लेखनीय म्हणजे, याचिकाकर्त्यांपैकी एकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अजमेर शरीफला चादर अर्पण न करण्याची विनंती करणारे निवेदनही दिले होते. ही याचिका ॲड. बरुण कुमार सिन्हा यांनी तयार केली असून, ॲडव्होकेट-ऑन-रेकॉर्ड अनंथा नारायण एम.जी. यांच्या मार्फत ती दाखल करण्यात आली होती.

## एमआयएम पक्षाची मान्यता रद्द करा, ओवेसींना देशाबाहेर हाकला - नवनीत राणांचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

काही दिवसांपूर्वी भाजप नेत्या नवनीत राणा यांनी एका मौलानाच्या वक्तव्याचा दाखला देत, जर ते १९ मुले जन्माला घालत असतील, तर आपणही किमान ४ मुले जन्माला घातली पाहिजेत, असे विधान केले होते. त्यानंतर एमआयएमचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी नवनीत राणांवर टीका करताना तुम्ही ४ नाही तर ८ मुले जन्माला घाला, आम्हाला काय देणेघेणे! असा टोला लगावला होता. आता नवनीत राणा यांनी त्यावर प्रत्युत्तर देत ओवेसी यांचे भारतीय नागरिकत्व काढून त्यांना पाकिस्तानात पाठवायला हवे, अशी बोचरी टीका केली आहे.

नवनीत राणा म्हणाल्या, असदुद्दिन ओवेसी हे एक ज्येष्ठ संसद सदस्य आहेत. एका लोकसभा मतदारसंघाचे ते प्रतिनिधित्व करतात. ते स्वत:च्या पक्षाचे नाव मोठ्याने घेतात. ते देशाच्या संविधानाबद्दल का बोलत नाहीत, असा माझा त्यांना



प्रश्न आहे. त्यांना विचारले की तुम्ही देशाच्या संविधानाला पुढे ठेवणार की इस्लामला पुढे ठेवणार, तर ओवेसी म्हणतात आम्ही आमच्या इस्लामला समोर ठेवू. भारत माता की जय म्हणायला यांना लाज वाटते. वंदे मातरम् बोलायला यांना लाज वाटते. संविधानाबद्दल हे काहीच बोलत नाहीत.

नवनीत राणा म्हणाल्या, ओवेसी यांचे भारतीय नागरिकत्व काढून त्यांना या देशातून बाहेर फेकले पाहिजे. मग हे पाकिस्तानमध्ये जाऊन दहा, वीस मुले जन्माला घालतील, यांना कुणीही विचारणार नाही. तेथे असलेल्या दारिद्र्याची त्यांना कल्पना येईल. मी हिंदूंनी चार मुले जन्माला घातली पाहिजे, असे वक्तव्य मी केले होते, तर ते उघडपणे स्वत:ची सहा मुले आहेत, असे म्हणतात. ज्या मौलानाने १९ मुले जन्माला घातली आहेत, त्या मौलानाला जाऊन भेटायचे आहे, असे सांगतात. तुमची इच्छा काय आहे, असा सवाल नवनीत राणांनी केला.

नवनीत राणा म्हणाल्या, पश्चिम बंगालमध्ये घुसखोरांची संख्या कशी वाढली, हे सांगा. मुंबईमध्ये यांची संख्या किती वाढली, याचे उत्तर द्या. घुसखोरांमुळे आसाममध्ये यांची दोनशे टक्क्यांनी वाढ झाली, यावर बोला. तेलंगणामध्ये दुप्पट वाढ झाली, यावर उत्तर द्या. दिल्लीमध्ये किती संख्या वाढली, हे सांगा. एक संसद सदस्य म्हणून संविधानाविषयी त्यांनी बोलले पाहिजे. तुम्ही भारतात राहता, तर तुम्ही भारत माता की जय बोलले पाहिजे. आम्ही दहा मुले जन्माला घालायला तयार आहोत. तुम्ही या भारतमातेचा सन्मान करणे शिकले पाहिजे. त्याचीही तुम्हाला लाज वाटते का असेही नवनीत राणा म्हणाल्यात .

## फडणवीसांच्या अमरावती दौऱ्यावर यशोमती ठाकूर यांचा घणाघात; ‘महायुतीचा उद्देश फक्त सत्ता आणि पैसा’



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

माजी मंत्री तथा काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अमरावती दौऱ्यावर जोरदार टीका केली आहे. फडणवीसांच्या दौऱ्यासाठी गाड्यांनी भाड्याने लोक आणण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच सामान्य नागरिकांना फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेता आली नाही, असेही त्या म्हणाल्या.यशोमती ठाकूर म्हणाल्या की, देवेंद्र फडणवीस यांनी अमरावतीकरांच्या अपेक्षाभंग केला असून महायुतीतील पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडणे सुरू आहेत. महायुतीचा उद्देश लोकांची सेवा नसून केवळ सत्ता आणि पैसा मिळवणे हाच आहे, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.महायुतीतील अंतर्गत वाद इतके टोकाला गेले आहेत की एक दिवस हेच पक्ष एकमेकांविरुद्ध उभे ठाकतील, असा दावाही त्यांनी केला. येणाऱ्या महापालिका निवडणुकीनंतर जनता महायुतीला योग्य उत्तर देईल, असेही त्या म्हणाल्या.भाजपच्या नेत्यांकडून संत-महात्म्यांचा अपमान होत असल्याचा आरोप करत सत्ताधारी धर्माच्या नावावर राजकारण करतात; मात्र त्यांना धर्माची खरी मूल्ये समजत नसल्याचे ठाकूर यांनी सांगितले. अखेरीस सत्ताधाऱ्यांचे वाटोळ होणे ही वस्तुस्थिती असल्याचे त्यांनी नमूद केले.

## भाजपात मुख्यमंत्र्यांविरुद्ध गट सक्रीय, नाना पटोलेंचा गौप्यस्फोट

### ‘बिनविरोध’वरुन निवडणूक आयुक्तांवरही हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापलं असून भाजपने निवडणुकांपूर्वीच ४४ नगरसेवक जिंकले आहेत. कारण, कल्याण डोंबिवलीसह काही महापालिकेत भाजप महायुतीचे जवळपास ६८ नगरसेवक बनिविरोध निवडून आले आहेत. त्यावरुन विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली असून मनसेनं न्यायालयात धाव घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्याच पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते तथा आमदार नाना पटोले यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना, भाजपमध्ये मुख्यमंत्र्यांविरुद्ध गट सक्रीय झाला आहे, असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांच्या नाराजीवर भाष्य केलं.

नारायण राणे यांनी निवृत्तीचे संकेत दिले आहेत, जेष्ठ नेत्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा, असे म्हणत नाना पटोले यांनी नाव न घेता भाजपमधील ज्येष्ठ नेत्यांना चिमटा काढला. तसेच, विधानसभा अध्यक्षांकडून उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आणलेल्या दबावरुन त्यांना बदलण्याची मागणीही पटोले यांनी केली. विधिमंडळाची परंपरा




आहे, लोकांना न्याय मिळेल, विरोधकांना न्याय मिळेल ही भूमिका असली पाहिजे. राजकारणी म्हणून त्यांना वावरता येत नाही, त्यामुळे भाजपचे त्यांना बदलावे, असेही नाना पटोले यांनी म्हटले. तर, निवडणूक आयुक्त हे भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत आहेत, असे म्हणत निवडणूक आयोगावरही त्यांनी जोरदार हल्लाबोल केला.

सरकार प्रचारात व्यस्त, जनता वाऱ्यावर आहे, म्हणूनच शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत आणि नेतेमंडळी हेलिकॉप्टरने फिरत आहे. ७० हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला, तरीही मी मोकळा आहे, अजित पवारांचे हे वक्तव्य सूचक आहे, अशी टीकाही नाना पटोले यांनी केली.शेतकऱ्यांच्या कर्जावरील स्टँप ड्युटी माफ करण्याच्या निर्णयावरूनही नाना पटोले यांनी टीका केली. निवडणुकीच्या तोंडावर केलेली ही घोषणा आहे, ही कर्ज घेण्याची वेळ नाही, आधी घोषणा केली असती तर फायदा झाला असता, महसूलमंत्री मुनगंटीवार यांचे काय सुरू आहे, ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माहित आहे. भाजपमध्ये भविष्यात स्फोट होईल, मुख्यमंत्री विरोधात गट सक्रीय झाला आहे. कुणाला जर याचे वाईट परिणाम भोगावे लागत असतील तर ते शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत, असे गौप्यस्फोटही नाना पटोले यांनी केला. दरम्यान, भाजपवाले मानसिक आजारी झाले आहेत, सत्तेचा माज आहे. लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल मोठा रोष आहे, याचा उद्रेक होईल. लोकांचे मत घेण्यासाठी हिंदू, मुस्लिम, मराठी, हिंदी या विषयांवर राजकारण सुरू आहे. कांग्रेस सर्वधर्मसमभाव असणारा पक्ष आहे, असेही नाना पटोले यांनी म्हटले.

## ‘निवडणुकीतून माघार घ्या’, ठाकरेंच्याच जिल्हाप्रमुखांनी उमेदवारांना अर्ज मागे घ्यायला लावले?

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.५मुंबई**

एका कथित ऑडिओ क्लिपमुळे कल्याण-डोंबिवलीमध्ये उद्धवसेनेमध्ये खळबळ उडाली आहे. उद्धवसेनेच्या उमेदवाराने स्वत:च्याच पक्षाच्या जिल्हाप्रमुखांवर गंभीर आरोप केले आहेत. बिनविरोध निवडणुकीमुळे चर्चेत आलेल्या या महापालिकेत अनेक उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. उद्धवसेनेच्या एका उमेदवाराने जिल्हाप्रमुखांनीच अर्ज मागे घ्यायला लावले, असा आरोप केला आहे. व्हायरल होत असलेल्या संभाषणाच्या क्लिपची ’दैनिक विदर्भ प्रजासत्ताक पुष्टी करत नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या प्रभाग क्रमाक २२ मधील उद्धवसेनेच्या उमेदवार




वैशाली पोटे यांनी जिल्हाप्रमुख तात्या माने यांच्यावर गंभीर आरोप केला आहे.

**’निवडणुकीतून माघार घ्या’, व्हायरल क्लिपमध्ये काय?**

जिल्हाप्रमुख तात्या माने यांची एक कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. ही क्लिप वैशाली पोटे यांनी पोस्ट केल्याची चर्चा आहे. व्हायरल क्लिपमधील संभाषणामध्ये तात्या माने निवडणुकीतून माघार घ्या, असे सांगत आहेत. या कथित क्लिपमध्ये तात्या माने हे आपल्याच पक्षाच्या उमेदवारांना अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकत आहेत. ’पक्षाचा आदेश आहे, उमेदवारी मागे घ्या. तुम्ही वरुण सरदेसाई यांच्याशी बोलून घ्या’, असे संभाषणही या क्लिपमध्ये आहे. या क्लिपमधील पुढील संभाषण असे आहे की, वरुन आदेश येतात, तेव्हा आपल्याला काही गोष्टी कराव्या लागतात. मी आता काय करू शकतो. पक्षाची वरच्या पातळीवर काय गणिते ठरतात, आपल्याला काय माहिती. मी काय करू शकतो, असेही तात्या माने वैशाली पोटे यांना सांगत आहेत.

**जिल्हाप्रमुखाच्या भूमिकेवरच शंका**

ही क्लिप व्हायरल झाल्यानंतर कल्याण-डोंबिवलीमध्ये उद्धवसेनेत खळबळ उडाली आहे. पक्षाचे नेतेच पक्षविरोधी काम करत असल्याची चर्चाही या क्लिपनंतर सुरू झाली आहे. तात्या माने यांनी याबद्दल अद्याप कोणतेही भाष्य केलेले नाही. उद्धवसेनेच्या नेत्यांकडूनही यावर अद्याप प्रतिक्रिया आलेली नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिकेमध्ये भाजपा-शिंदेसेनेचे अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांच्या विजयाची घोषणा अद्याप झालेली नाही. अनेक प्रभागामध्ये विरोधी उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने बिनविरोध निवडणूक झाली आहे. पण, २१ ठिकाणी बिनविरोध झाल्याने आरोप होत आहेत.

## काल निवृत्तीचे संकेत, आज तब्येत बिघडली; भाषण सुरू असतानाच नारायण राणेंना आली भोवळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चिपळूण**

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यामुळे आता सत्ताधारी आणि विरोधकांकडून जोरदार प्रचाराला सुरुवात झाली आहे. मात्र एकीकडे प्रचार सुरू असतानाच दुसरीकडे



भाजपचे खासदार आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी रविवारी (०४ जानेवारी) राजकीय निवृत्तीचे संकेत दिले होते. आता घरी बसायचे ठरवलंय, दोन्ही मुलांना सांगेन नांदा सौख्यभरे असे भावनिक उद्गार त्यांनी सिंधुदुर्गातील एका कार्यक्रमात काढले. यानंतर आज (०५ जानेवारी) चिपळूण येथे आयोजित एका सार्वजनिक कार्यक्रमात भाषण करताना नारायण राणेंना अचानक भोवळ आली. त्यामुळे सर्वांची धावपळ उडाल्याचं पाहायला मिळाले.

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे सध्या ‘कृषी महोत्सवाचे’ आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या कार्यक्रमाला नारायण राणे उपस्थित होते. व्यासपीठावरून भाषण करत असताना नारायण राणे यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. महत्त्वाचे म्हणजे आपल्या भाषणाच्या अखेरच्या टप्प्यात नारायण राणे यांचा आवाजही बसला होता, त्यामुळे त्यांनी आपले भाषण आटोपते घेतले. यानंतर त्यांना भोवळ आली. यावेळी व्यासपीठावर उपस्थित नारायण राणे यांच्या कार्यकर्त्यांनी आणि सुरक्षा रक्षकांनी त्यांना तातडीने आधार दिला. या घटनेनंतर नारायण राणे यांनी माध्यमांशी बोलण्यास नकार दिला आणि ते थेट कार्यक्रमाच्या ठिकाणाहून त्यांच्या गेस्ट हाऊसकडे रवाना झाले. मात्र काल निवृत्तीचे संकेत आणि आज नारायण राणे यांची तब्येत बिघडल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ‘क्रांतिज्योती’ची पोरं महाराष्ट्रभर ठरली सुपरहिट! पहिल्याच वीकेंडला ३.९१ कोटींची बंपर कमाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ मुंबई**

मराठी शाळेच्या अस्मितेला नवा आवाज देणारा ‘क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम’ हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, प्रदर्शित होताच चित्रपटगृहांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. तसेच सोशल मीडियावर(डेलळरश्र चशवळर) व बुक माय शोवर चित्रपट ट्रेंडिंग ठरत आहे. या चित्रपटाने पहिल्याच वीकेंडला तब्बल ३.९१ कोटींचा गल्ला जमवला आहे. जोरदार कमाई करत हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर(डुजषळलश) धुमाकूळ घालत आहे.

पहिल्याच दिवसापासून अनेक शहरांमध्ये चित्रपट हाऊसफुल जात असून, मराठी शाळेच्या आठवणींमध्ये रमलेले प्रेक्षक भावुक होऊन चित्रपटगृहातून बाहेर पडताना दिसत आहेत. चित्रपटातील आशय, संवाद, भावनिक क्षण आणि वास्तववादी मांडणी यामुळे प्रेक्षकांशी थेट नाळ जुळली आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनीच या चित्रपटाला डोक्यावर घेतले आहे.

चित्रपटाच्या प्रभावी कथेची मांडणी, कलाकारांची नैसर्गिक अभिनयशैली, मनाला भिडणारे संगीत आणि प्रत्येक फ्रेममधून जाणवणारी मराठी मातीची ओढ यामुळे हा चित्रपट केवळ एक सिनेमा न राहता एक अनुभव ठरत आहे. समीक्षकांकडूनही या चित्रपटाला भरभरून दाद मिळत असून मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकारांनी सोशल मीडियावरून या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले आहे. प्रेक्षकांकडून दिग्दर्शक हेमंत ढोमे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, राज्यभरातून त्यांना कौतुकाचे मेसेजेस आणि शुभेच्छा मिळत आहेत. अनेक प्रेक्षक चित्रपट पाहिल्यानंतर थेट दिग्दर्शकांना भेटण्याची इच्छा व्यक्त करत आहेत, हीच या कलाकृतीच्या यशाची खरी पावती ठरत आहे.

## संपादकीय ......

# सतरंज्या कोण उचलणार?

मला तिकीट मिळाले नाही. म्हणून रडत बसणारा मी कार्यकर्ता नाही. मी पक्षाचा साधा शिपाई आहे. उडी मार म्हटले की, मी उडी मारणार आहे. का म्हणून आमच्यात विचारायचे नसते. आदेशाचे सक्त पालन करायचे, हा मंत्र मी जपला आहे.

मला नेते मंडळी जवळून ओळखतात; पण एबी फॉर्म वाटताना त्यांच्या लक्षातच येत नाही की, मी पक्षाचा सच्चा पाईक आहे. कदाचित हीच गोष्ट त्यांना खूप आवडत असावी. मला एबी फॉर्म दिला नाही तरी पक्षाचे काही नुकसान होणार नाही, हे त्यांना मनोमन वाटत असावे.खरं तर, मी स्वप्नातसुद्धा दुसऱ्या पक्षात जात नाही. स्वप्नात जर एखाद्या पक्षाचे कार्यालय आडवे आले तर मी माझा रस्ताच बदलतो. मग प्रत्यक्षात मला कुठला पक्ष जवळ करेल? माझ्या बरोबरीचे पक्षातले लोक नगरसेवक झाले. नंतर आमदार झाले. नंतर मंत्रीही झाले. मी त्यांना ओळखतो. माझे त्यांचे अरे-तुरेचे संबंध आहेत; पण विशिष्ट मर्यादेपर्यंत!

मी त्यांच्या ओळखीचा कधीही दुरुपयोग करत नाही. माझ्या रक्तातच नाही राव. माझ्या सुनेची बदली आमच्या गावी करायची होती; पण मी तत्त्वाशी इमान राखले. अहो चॅरिटी कुठून सुरू होते? आपल्या घरापासूनच का? म्हणून मी माझ्या दारावर पाटी लिहून ठेवलीय... कृपया नेमणूक वा बदलीसाठी कुठेही भीड घालू नये! ही गोष्ट इतकी व्हायरल झाली आहे की, बदलीसाठी कुणीही माझ्याकडे रद्दबदली करत नाही. कारण, त्यांना गॅरंटी आहे की, माझ्याकडे एखादे काम घेऊन गेलो तर ते होण्याची एक टक्कासुद्धा गॅरंटी नसते.असा मी पक्षाचा तळमळीचा, तळागाळातला आणि (कायमस्वरूपी) गाळात आडलेला कार्यकर्ता! मला महापालिकेचे तिकीट नाकारण्यात आले. त्याची पक्षाला यत्किंचितही खंत वाटली नाही. मलाही वाटली नाही. कारण, पक्षातील महत्त्वाची भूमिका मी बजावत असतो- सतरंज्या उचलायची. लेकाचे सतरंजीवर बसतात. सभासंमेलने पार पाडतात.

कुठले कुठले ठराव मंजूर करत असतात; पण बैठका आटोपल्यानंतर सतरंज्या तशाच टाकून जातात. त्या गोळा कुणी करायच्या! माझ्याच्याने ते बघवत नाही. मग मी एकटाच शांतपणाने त्या गोळा करतो, त्यांच्या घड्या घालतो आणि कपाटात एकावर एक रचून ठेवतो. गेल्या तीस वर्षांत कितीतरी सत्तांतरे झाली; पण कपाटातील एक सतरंजी इकडची तिकडे झाली नाही.

# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा.त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता,



विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्र्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्रहोय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी दर्पणमध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदी टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे मुकनायक ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# एका कुंपणाचे अनेक फायदे, एकदा बांबूचे सजीव कुंपण करा, ४० वर्ष बिनधास्त राहा, बांबू कुंपणाची संपूर्ण माहिती

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

शेतशिवार तसेच प्रक्षेत्राच्या सिमेवर मोकाट गुरे, वन्यप्राणी, आगंतुक यांचा प्रक्षेत्रावर प्रवेश थांबविण्यासाठी बांबू करवंद, अगेव व अन्य सजिव वनस्पतींची एक किंवा अनेक ओळीत विशिष्ट रचना व लागवड करुन वाढविलेल्या कुंपणास सजिव कुंपण म्हणतात.




सजिव कुंपणाचे अनेक फायदे असून ते बांबू सारख्या बहुउपयोगी वनस्पतीचे असल्यास चार ते पाच वर्षात शेतकऱ्याला परिपक्व बांबूच्या विक्री मधून प्रति १०० बांबू वेटापासून १२ हजार ५०० रुपये ते २० हजार रुपयांचे निव्वळ उत्पन्न अपेक्षित आहे. बांबूचे कुंपण एकदा तयार झाल्यावर ते ३५ ते ४० वर्ष कायम राहत असते व त्यापासून प्रतिवर्षी उत्पन्न मिळत राहते.बांबू हे ३० ते ५० मीटर उंच वाढणारी वनस्पती असून सुरुवातीची दोन वर्षे काळजी घ्यावी लागते. त्यानंतर ओलीत, रोगराई व देखरेख यासारख्या कामावर खर्च करण्याची आवश्यकत्ता नसते. बांबूची लागवड केल्यावर त्याचे बेट तयार होते. ते दीड ते दोन मीटर पर्यंत चारही बाजुस पसरते. त्यामुळे सजिव कुंपण तयार होते. बांबूच्या फांद्या एकमेकात मिळतात व वाट कुंपण तयार होते.

त्यामधून लहान वन्यप्राणी जसे रानडुक्कर, हरिण, सायाळ व शेळ्या, मेंढया यांचा प्रवेश टाळता येतो. तसेच, बांबूचे सजीव कुंपण ३० ते ५० फुट उंच असल्याने मोठे जंगली प्राणी जसे निलगाय, रोही, सांबर, हत्ती, माकड, गाय, म्हैस, घोडे ई यांचा प्रवेश टाळता येतो.




सजीव कुंपण म्हणून बांबूची लागवड केल्यास शेत जमिनीचे तापमान नियंत्रित राहते. बांबूच्या पालापाचोळयापासून सेंद्रिय खत तयार होते, जमिनीची धूप थांबते, तणांचा प्रादुर्भाव कमी होतो, शेताचे सीमांकन होते व यासारखे प्राकृतिक फायदे होतात.

बांबूचे सजिव कुंपण तयार करण्यासाठी पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करावा. ओलिताची सोय असलेल्या शेतावर पावसाळा व हिवाळा (जुलै ते डिसेंबर) या महिन्यात लागवड करता येईल. कोरडवाहू शेतीत व हमखास पावसाचे प्रदेशात जुलै ते ऑगस्ट या महिन्यात लागवड पूर्ण करावी.

मध्यम ते कमी पावसाव्या प्रदेशात जुलै महिन्यात लागवड पुर्ण करावी. वरील दोन ते तीन स्थितीमध्ये लागवडीपासून सुरुवातीचे दोन वर्ष उन्हाळयात आठवडयाला एक असे प्रति झाड १० ते १२ लिटर पाणी द्यावे.

गड्डे तयार करणे उथळ मध्यम खोलीच्या जमिनीवर ४५ सेंटीमीटर पर्यंत ३० ते ४५ सेंटीमीटर खोल व ४५ सेंटीमीटर रुंद खड्डे तयार करावे (४५ ४५ ४५ सेंटीमीटर) जास्त खोलीच्या जमिनीवर ३० सेंटीमीटर खोल पर्यंत खड्डा तयार करावा व रुंदी ३० से. मी. असावी (३०४३०४३० सें. मी)


शेतासभोवती १ मीटर रुंद व १ मीटर खोल चर खोदून त्यामध्ये लागवड केल्यास उत्तम प्रतीचे व जास्त कार्यक्षम कुंपण अल्पावधीत (तीन वर्षात) तयार होते. लागवडीचे अंतर शेतासभोवती उपलब्ध जागेच्या रुंदीनुसार कुंपणातील ओळींची संख्या ठरवली जाते. शेतासभोवती ३ ते ४ मीटर जागा उपलब्ध असल्यास बांबूच्या एका ओळीची लागवड करावी. यासाठी दोन रोपांमधील अंतर १ ते १.५० मीटर ठेवावे.

शेतासभोवती ५ ते ७ मीटर जागा उपलब्ध असल्मास दोन ओळीत मागे पुढे (डींरससशीशव) पध्दतीने रोपांमधील अंतर २ मीटर ठेवून बांबूची लागवड करावी.

**- डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अखिल भारतीय समन्वयीत कृषि वनशेती संशोधन प्रकल्प, कृषि महाविद्यालय, नागपूर**

# केवळ १० मिनिटांचा व्यायाम अन आतड्याच्या कॅन्सरपासून संरक्षण

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**



बदलती जीवनशैली आणि व्य अभाव यामुळे जगभरात कर्करोगा वाढत आहे. मात्र, आता एक संशोधनाने दिलासादायक माहित आणली आहे. न्यूकॅसल युनिव्ह संशोधकांनुसार, दररोज केवळ १ मिनिटांचा वेगवान व्यायाम आतड्याच्या कर्करोगाचा




लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो, इतकेच नाही तर हा व्यायाम कॅन्सरच्या पेशींची वाढ रोखण्यासही मदत करतो.

**संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष**

रक्तातील बदल : संशोधकांनी ३० निरोगी; परंतु वजन जास्त असलेल्या पुरुषांच्या रक्ताचे नमुने १० मिनिटांच्या सायकलिंग आधी आणि नंतर तपासले. व्यायामानंतर रक्तामध्ये विशिष्ट प्रथिनांची वाढ झाल्याचे दिसून आले, जे कर्करोगाच्या पेशींशी लढण्यास सक्षम असतात.

डीएनए रिपेअर : तीव्र व्यायामामुळे शरीरातील इंटरल्युकीन-६ (आयएल-६) नावाच्या घटकाची पातळी वाढते. हा घटक जळजळ कमी करतो आणि पेशींच्या डीएनएची दुरुस्ती करण्याची प्रक्रिया वेगवान करतो.

कॅन्सरला प्रतिबंध : प्रयोगादरम्यान असे दिसून आले की, व्यायामानंतर तयार झालेले रक्त जेव्हा कॅन्सरच्या पेशींच्या संपर्कात आले, तेव्हा त्या पेशींची वाढ थांबली आणि सुमारे १३०० हून अधिक जनुकांमध्ये (जीन्स) सकारात्मक बदल

**भारतीय संदर्भात महत्त्व**

भारतात दरवर्षी आतड्याच्या कर्करोगाचे सुमारे ५०,००० नवीन रुग्ण आढळतात. प्रामुख्याने कमी फायबरयुक्त आहार, लाल मांस आणि बसून राहण्याची जीवनशैली यामुळे हा धोका वाढत आहे. अशा परिस्थितीत, वेळ नाही असे म्हणणाऱ्यांसाठी १० मिनिटांचा हा शॉर्ट वर्कआऊट एक प्रभावी उपाय ठरू शकतो. डीएनए रिपेअर : तीव्र व्यायामामुळे शरीरातील इंटरल्युकीन-६ (आयएल-६) नावाच्या घटकाची पातळी वाढते. हा घटक जळजळ कमी करतो आणि पेशींच्या डीएनएची दुरुस्ती करण्याची प्रक्रिया वेगवान करतो.

**काय करावा व्यायाम?**

(१० मिनिटांचा प्लॅन)

संशोधक सुचवतात की, व्यायामाची तीव्रता अशी असावी जिथे तुम्हाला बोलणे कठीण होईल.३० सेकंद : बर्पीज किंवा वेगाने पायऱ्या चढणे.

३० सेकंद : स्कॅटस किंवा जंपिंग जॅक.

विश्रांती : २० सेकंद. हे चक्र ४ ते ५ वेळा पुन्हा करा. निष्कर्ष : नियमित व्यायामामुळे कॅन्सर परत येण्याचा धोका २८ टक्क्यांनी कमी होतो, तर जगण्याची शक्यता ३७ टक्क्यांनी वाढते. त्यामुळे आजपासूनच आपल्या आरोग्यासाठी फक्त १० मिनिटे काढण्यास सुरुवात करा, असा सल्ला संशोधकांनी दिला आहे.

# अजित पवारांविषयी बोलण्याची नवनीत राणांची लायकी नाहीआमदार संजय खोडके आक्रमक



## कुणीही बोलतांना मर्यादा ओलांडूनये, असा सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपने भ्रष्टाचार केल्याचा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवारयांनीकेला होता. ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्या सगळ्यांसोबत मी आज सरकारमध्ये बसलोय ना, असा युक्तिवादही अजित पवारांनी केला होता. या विधानाचे पडसाद उमटत असताना भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनीही त्यावर भाष्य केले होते. कुणीही बोलताना मर्यादा ओलांडू नये, असा सल्ला नवनीत राणांनी दिला होता.

दरम्यान, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आ. संजय खोडके यांनी नवनीत राणा यांच्या प्रतिक्रियेवर प्रत्युत्तर दिले आहे. खोडके म्हणाले, अजित पवार यांच्याविषयी बोलण्याची नवनीत राणा यांची लायकी नाही. अजित पवार यांच्यामुळेच त्यांना लोकसभा पहायला मिळाली. अजित पवार नसते, तर त्यांना लोकसभा सुद्धा पहायला मिळाली नसती.प्रत्येक वेळी विश्वासघातकी राजकारण करणाऱ्यांनी आपली पात्रता पहावी. पात्रतेनुसार बोलावे. भाजपचे वरिष्ठ नेते आणि अजित पवार हे आपसात काय आहे, ते पाहतील. पण, लायकी नसताना अजितदादांविषयी बोलणे ह शोभत नाही. त्यावेळी जर अजितदादांनी आम्हाला रोखले नसते आणि दोन महिने मी इथे थांबलो असतो, तर त्या लोकसभा निवडणुकीत निवडून येऊ शकल्या नसत्या. आता यापुढेही त्या कशा निवडून येतात, ते पाहून घेऊ.संजय खोडके पुढे म्हणालेत की पिंपरी चिंचवड देशातील सर्वात चांगली महापालिका म्हणून पिंपरी चिंचवड महापालिकेचा नावलौकिक होता. या महापालिकेला मोठा निधी अजित पवार यांनी उपलब्ध करून दिला होता. पण, या महापालिकेवर भाजपची सत्ता असताना काही स्थानिक नेत्यांच्या चुकीच्या कामांमुळे ती पूर्णपणे नेस्तनाबूत झाली, असे बोलण्याचा अजित पवार यांचा रोख होता. पण, भाजप हा शब्द वापरल्यामुळे संपूर्ण राज्यातून प्रतिक्रिया उमटल्या.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. ५ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# अमरावतीत महापालिका निवडणूक प्रचाराचा 'श्री गणेशा'

## देवाभाऊच्या 'रोड शो' ने अंबानगरी दणाणली...

### रोडशोला पंचवटी ते साईनगर रोडच्या दुतर्फा प्रचंड गर्दी ठिकठिकाणी स्वागत, पुष्पवृष्टी, फटाक्याची आतिषबाजी



## देवाभाऊ माझा, हा.. देवा भाऊ... माझा....!

### खुल्या जिपमधून मुख्यमंत्र्यांचे अमरावतीकरांना अभिवादन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती** नगर परीषद, नगर पंचायत प्रमाणे महापालिका निवडणूक प्रचाराचा शुभारंभ अमरावतीमधून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. दुपारी २ वाजता पंचवटी येथून सुरु झालेल्या या रोडने संपूर्ण अंबानगरी दणाणून गेली होती. देवाभाऊ माझा, हा.. देवा भाऊ... माझा.... ! या गिताने वातावरण भाजपमय झाले होते. एकीकडे रोडच्या दुतर्फा मुख्यमंत्र्यांवर पुष्पवृष्टी होत असताना खुल्या जिपमधून मुख्यमंत्र्यांचे अमरावतीकरांना अभिवादन करीत होते.

पंचवटी ते साईनगर दरम्यान झालेल्याया रोडशो दरम्यान, ठिकठिकाणी संबंधित प्रभागातील उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेषतः लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री देवाभाऊंचा हार, पुष्पगुच्छ देत स्वागत करण्यात आले. यावेळी महिलांनी पुष्पवृष्टी केली. तर ढोल ताशांचा गजर आणि फटाक्याच्या आतिषबाजीने संपूर्ण वातावरण दणाणून गेले होते. विशेष म्हणजे चौकाचौकात रांगोळ्यांसह केळींच्या पानांनी रोड, चौकांची साजसजावट करण्यात आली होती.अमरावती महापालिका निवडणूक प्रचाराचा श्री गणेशा रविवारी ४ जानेवारीला दुपारी २ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोडशोद्वारे सुरू झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अमरावतीकरांना अभिवादन करण्यासाठी निघाले होते. पंचवटी चौक येथून सुरू झालेला मुख्यमंत्र्यांचा रोड शो हा गाडगे नगर, राठी नगर, शेगाव नाका मार्गे विलास नगर, चौधरी चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गांधी चौक, भूतेश्वर चौक, रवीनगर चौक मार्गे साईनगरपर्यंत झाला.



### स्टार प्रचारक नवनीत राणासाईनगर मध्ये गैरहजर

भुतेश्वर चौकापर्यंत मुख्यमंत्र्यांच्या रोडशोला जीपमध्ये असलेल्या भाजपाच्या स्टार प्रचारक नवनीत राणा मुख्यमंत्री उतरल्याने गाडीच्या खाली उतरल्या. मुख्यमंत्री पुढे साईनगरला गेले. तेथे त्यांची सभा झाली. या सभेला रोड शो दरम्यान असलेल्या सर्व भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. मात्र प्रभाग १९ साईनगर येथे झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या सभेला नवनित राणा उपस्थित राहिल्या नाही. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती.



### तुषार भारतीय यांना निवडून आणू

रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोड शो दरम्यान प्रसार माध्यमासोबत बोलत असतांना साईनगर प्रभागातील उमेदवार तुषार भारतीय यांच्या निवडणुकी संदर्भात त्यांना प्रश्न विचारला असता मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की तुषार भारतीय हे मागच्या वेळेस ही या प्रभागातून निवडून आले होते या ही वेळी त्यांना निवडून आणू.

### जीपमध्ये अनेक पदाधिकारी

मुख्मयंत्र्यांसोबत खुल्या जीपमध्ये जिल्ह्याच्या माजी खासदार नवनीत राणा, भाजपाचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, विधान परिषदेचे माजी सदस्य प्रवीण पोटे, ॲड. प्रशांत देशपांडे, जयंत डेहनकर, संजय कुटे, शिवराय कुळकर्णी, आ. प्रताप अडसड, उपस्थित होते. रोड शो दरम्यान मार्गात प्रत्येक चौकात मुख्यमंत्र्यांचे स्वागत करण्यात आलं. प्रत्येक चौकात नागरिकांची गर्दी होती. पंचवटी ते साईनगर दरम्यानझालेल्याया रोडशो दरम्यान शहरातील तसेच जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, मुख्यतः महिला मंडळींनी प्रचंड गर्दी केली होती. गळ्यात भाजपचा दुपट्टा व डोक्यात भाजपची टोपी....यामुळे सर्व' भगवामय' चित्र दिसत होते.

### ठिकठिकाणी स्वागत, पुष्पवृष्टी

पंटवटी चौकापासून ते साईनगर दरम्यान लागलेल्या सर्वच मुख्य चौकात ठिकठिकाणी संबंधित प्रभागातील उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेषतः लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री देवाभाऊंचे मोठ्या उत्साहात आणि गगनभेदी घोषणा देत जल्लोषात स्वागत केले. कुणी हार, तर कुणी पुष्पगुच्छ देत देवाभाऊंचे स्वागत करण्यासाठी आतुर झाल्याचे चित्र होते. विशेषतः रोड शोची प्रतिक्षा करीत असलेल्या महिलांनी दोन्ही बाजुंनी देवाभाऊ असलेल्या जीपवर पुष्पवृष्टी केली.आणि फटाक्याच्या आतिषबाजीने संपूर्ण शहरातील वातावरण दणाणून गेले होते.

### रस्त्यावर पोलिसांची विविध पथके होती सतर्क

रोड शोसाठी नियुक्त केलेल्या मार्गावर कोणताही अडथळा येऊ नये म्हणून, पंचवटी ते रवी नगर पर्यंत संबंधित पोलिस ठाण्यांमधील अधिकारी आणि कर्मचारी आधीच तैनात करण्यात आले होते. याव्यतिरिक्त, गुन्हे शाखा, बीडीडीएस, कमांडो, क्यूआरटी, दामिनी पथक आणि गुप्तचर पोलिसांचे अधिकारी आणि कर्मचारी देखील रस्त्यावर उपस्थित होते, ते सतत रस्त्यांवर गस्त घालत होते आणि नियुक्त केलेल्या मार्गाचे निरीक्षण करत होते.तर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्वतः संपूर्ण बंदोबस्ताची कमान सांभाळली.

# 'लव्ह जिहाद' मुद्द्यावर राजकारण तापले

## ओवैसी यांचा आरएसएस प्रमुख मोहन भागवतांवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांच्या 'लव्ह जिहाद' संदर्भातील विधानानंतर राजकीय वातावरण तापले आहे. 'लव्ह जिहाद' रोखण्यासाठी कुटुंबांमध्ये मजबूत आणि नियमित संवाद असावा, असे मत भागवत यांनी व्यक्त केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर एआयएमआयएमचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी जोरदार प्रतिक्रिया दिली आहे.ओवैसी यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर 'लव्ह जिहाद'सारखी गोष्ट प्रत्यक्षात घडत असेल, तर सरकार आणि आरएसएसने त्याबाबत ठोस पुरावे आणि अधिकृत नोंदी सादर कराव्यात. जर एखादी मुलगी १८ वर्षांची किंवा मुलगा २१ वर्षांचा असेल आणि ते स्वतःचा निर्णय घेत असतील, तर त्यात कुणाच्या आवडीनिवडीचा प्रश्नच येत नाही. कायदाही याला परवानगी देतो, असे ते म्हणाले.ओवैसी यांनी सवाल उपस्थित केला की, जर 'लव्ह जिहाद' अस्तित्वात असेल, तर मागील ११



वर्षांचा डेटा संसदेत का सादर केला जात नाही. त्यांनी उपरोधिक टोला लगावत सांगितले की, आधी 'लव्ह जिहाद'ची नेमकी व्याख्या तरी ठरवा. जर व्याख्या केली तर भाजपचे अनेक नेते स्वतः लव्ह मॅरेज करणारे आढळतील, असेही ते म्हणाले.युवकांना रोजगाराची गरज असून सरकार त्यांचे लक्ष भावनिक आणि वादग्रस्त मुद्द्यांकडे वळवत असल्याचा आरोपही ओवैसी यांनी केला. चीन, लडाख आणि गलवानसारख्या गंभीर मुद्द्यांवर सरकार मौन बाळगत असल्याचे सांगत त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली.

# रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाने शेकडो कामगारांना ग्रॅज्युइटी पासून ठेवले वंचित

## भाजप नेते विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वात आजपासून कामगारांचे उपोषण

### प्रशासनाला निवेदने देऊनही दखल नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नांदगाव पेठ-** पंचतारांकित एमआयडीसी परिसरातील रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पात काम करणाऱ्या शेकडो कामगारांना कायदेशीर हक्काची ग्रॅज्युइटी (उपदान) न दिल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.कामगारांनी वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे आजपासून कामगार भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या नेतृत्वात उपोषणाला बसणार आहेत.या उपोषणाच्या माध्यमातून कामगारांची आर या पार ची लढाई सुरू होणार आहे.कामगार,प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाकडून वारंवार होणाऱ्या अन्यायाविरोधात आता कामगार एकवटले असून रतन इंडिया व्यवस्थापनासह प्रशासनाचे धाबे दणाणले आहे. रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाची सह कंपनी असलेल्या दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी ( डीएमएफ) या कंपनीतील कामगारांनी दि. १३ नोव्हेंबर २०१७ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत सलग ७ वर्षे ६ महिने सेवा पूर्ण केली असून, ग्रॅज्युइटी कायद्यानुसार त्यांना उपदान मिळणे बंधनकारक आहे. मात्र डीएमएफ कंपनीचे कामकाज ३० एप्रिल २०२५ रोजी संपुष्टात येऊनही आज त्याला ७-८ महिने उलटून गेले तरी एकाही कामगाराला ग्रॅज्युइटी मिळालेली नाही, असा गंभीर आरोप कामगारांच्या वतीने करण्यात आला आहे. इतकेच नव्हे तर मार्च २०२१ च्या वेतनातून कामगारांचे प्रत्येकी १२०० ते १३०० रुपये कपात केलेली रक्कमही आजतागायत परत करण्यात आलेली नाही, ही बाब कामगारांवर अन्याय करणारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

कामगारांनी ग्रॅज्युइटीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही कंपनी व्यवस्थापनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात येत आहे. कामगारांनी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांना याबाबत माहिती दिली असता विवेक गुल्हाने यांनी इंडिया ऊर्जा प्रकल्प व्यवस्थापन,जिल्हा प्रशासन,कामगार आयुक्त यांना लेखी निवेदन देऊन ४ जानेवारी २०२६ पर्यंत कामगारांचा प्रश्न सोडविण्याची व त्यांना न्याय देण्याची मागणी केली होती अन्यथा ५ जानेवारीपासून रतन इंडिया कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सर्व कामगारांसह बेमुदत उपोषण व ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा देण्यात आला होता.

दरम्यान प्रशासनाने तसेच रतन इंडिया व्यवस्थापनाने कामगारांच्या निवेदनाच्या केराची टोपली दाखवत कामगारांना ठेंगा दाखविण्याचा प्रयत्न केला त्यामुळे कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.रतन इंडियासमोर लाचार झालेल्या कामगार आयुक्तांनाही कामगारांचे हक्क, कष्ट आणि वेदनांचा विसर पडला असून आजवर असंख्य निवेदने देऊनही कामगारांच्या कोणत्याही समस्यावर कामगार कार्यालयाने तोडगा न काढता मालकांच्या बाजूने न्याय देण्यात धन्यता मानत आहे त्यामुळे संतप्त कामगार आजपासून न्याय मिळेपर्यंत उपोषणाला बसणार आहेत. या प्रकरणाकडे लोकप्रतिनिधी व प्रशासन लक्ष देणार का, की कामगारांचा संघर्ष आणखी तीव्र होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कामगारांच्या कष्टाचे पैसे परत मिळावेत



रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातील सहकंत्राटदार दिल्ली मॅनेजमेंट फॅसिलिटी कंपनीने कामगारांवर अन्याय केला आहे. कामगारांना एकही रुपया फुकटचा नको; मात्र ७ वर्षे ६ महिन्यांची ग्रॅज्युइटी आणि मार्च २०२१ मध्ये कपात केलेली प्रत्येकी १२०० ते १३०० रुपयांची रक्कम व्याजासह परत द्यावी, ही माफक अपेक्षा आहे.कामगारांच्या या तक्रारीचे निवेदन आमचे नेते आ.राजेश वानखडे यांनाही दिले असून ते कामगारांना नक्कीच न्याय मिळवून देतील ही अपेक्षा आहे.

**विवेक गुल्हाने,** जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा अमरावती.

# सुधीर केने यांना पुणे येथील शिवप्रतिष्ठानचा राज्यस्तरीय शिक्षक रत्न पुरस्कार जाहीर

विदर्भ प्रजासत्ताकदि.५ चांदुर रेल्वे :२०शिव प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने तालुक्यातील मालखेड रेल्वे येथील वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालयात कार्यरत असणारे शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांची राज्यस्तरीय महाराष्ट्र आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे.समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य तसेच सातत्यपूर्ण योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.शिव प्रतिष्ठानने पाठविलेल्या पत्राद्वारे केने सरांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या प्रेरणादायी कार्यामुळे



समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या प्रयत्नांतून अनेकांना नवी दिशा व उमेद मिळाल्याचेही पत्रात स्पष्ट केले आहे.या पुरस्काराचा वितरण सोहळा २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता, समर्थ मंगल कार्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या समारंभात मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सुधीर केने हे माहिती अधिकार कायद्याचे राज्य प्रशिक्षक असून त्यांचेचार पुस्तकही प्रकाशित झाले आहेत.दूरदर्शन व आकाशवाणीवरही त्यांचे कार्यक्रम झाले आहेत.

### मेळघाटात 'कुमारी माता'ची धक्कादायक प्रकरणे

# दोन अल्पवयीन मुलींवर मातृत्व लादले

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती** :मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यात दोन अल्पवयीन मुलींवर मातृत्व लादल्याच्या धक्कादायक घटना समोर आल्या असून, नववर्षातील अत्याचाराचे पहिले दोन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या दोन्ही मुलींची जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथे प्रसूती झाली असून, गर्भधारणेच्या वेळी त्या अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले आहे.या प्रकरणी संबंधित संशयितांविरुद्ध बलात्कार व पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, घटनास्थळ धारणी व चिखलदरा तालुक्यातील असल्याने गुन्हे संबंधित पोलीस ठाण्यांकडे वर्ग करण्यात आले आहेत.धारणी तालुक्यातील एका अल्पवयीन मुलीशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी २ जानेवारी रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. संबंधित मुलीची जिल्हा स्त्री रुग्णालयात प्रसूती झाली असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.दरम्यान, चिखलदरा तालुक्यातही अशीच घटना शनिवारी रात्री समोर आली आहे. चिखलदरा पोलिसांनी विशाल नामक संशयिताविरुद्ध २ जानेवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे. संशयित व अल्पवयीन मुलीमध्ये प्रेमसंबंध असल्याचे सांगण्यात येत असून, ती स्वेच्छेने त्याच्या घरी राहायला गेली होती. त्यानंतर त्यांच्यात शारीरिक संबंध प्रस्थापित झाले. या अल्पवयीन मुलीची १५ डिसेंबर रोजी प्रसूती झाली होती.बालविवाह व लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी प्रशासन विविध मोहिमा राबवत असले तरी मेळघाटात अशा प्रथा अद्यापही सुरू असल्याचे या घटनांतून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणांमुळे ग्रामीण भागातील बालसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# अमरावती मनपा निवडणूक: प्रमुख पक्षांचे जाहीरनामे अंतिम टप्प्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती -** अमरावती महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाल्यानंतर सर्वच प्रमुख राजकीय पक्ष आता जाहीरनामे प्रसिद्ध करण्याच्या तयारीत आहेत. अमरावतीतील २२ प्रभागांमधून ८७ नगरसेवक निवडले जाणार असून, यासाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. ३ जानेवारी रोजी चिन्ह वाटप पूर्ण झाल्याने सर्व उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचत आहेत.भाजपच्या जाहीरनाम्याची सूत्रे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांच्याकडे आहेत, तर काँग्रेसच्या जाहीरनाम्याला त्यांचे प्रदेश प्रवक्ते आणि माजी महापौर मिलिंद चिमोटे आकार देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने माजी महापौर ड. किशोर शेळके यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली आहे, तर शिवसेनेने (उबाठा गट) जिल्हाप्रमुख पराग गुडधे यांच्या नेतृत्वाखाली जाहीरनामा तयार केला आहे. शिवसेनेच्या (शिंदे गट) कॅप्टन अभिजीत अडसूळ यांच्याकडे जाहीरनाम्याची जबाबदारी आहे.भाजपने केंद्र आणि राज्य सरकारच्या धर्तीवर 'विकसित





अमरावती-सुरक्षित अमरावती' हा मुद्दा जाहीरनाम्याच्या केंद्रस्थानी ठेवला आहे. जनतेला सर्व आवश्यक सुविधा पुरवण्यासोबतच शहराचा वेगाने विकास करण्याचा संकल्प भाजपने केला आहे. केंद्र आणि राज्यात भाजपचे सरकार असल्याने विकासाला गती मिळेल, असे निवडणूक प्रमुख जयंत डेहनकर यांनी सांगितले.काँग्रेसचे महानगर अध्यक्ष बबलू शेखावत यांच्या मते, गेल्या तीन-चार वर्षांपासून मनपात प्रशासकीय भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. केंद्र आणि राज्यात एकसुरी सत्ता असल्याने मनपातील तत्कालीन सत्तापक्षाचीही या भ्रष्टाचाराला मूक संमती होती. कचरा संकलन नियमित होत नाही आणि प्रशासनाने करवाढ रद्द करण्याची स्थगितीही नकळतपणे उठवली, असे काँग्रेस आपल्या जाहीरनाम्यातून मांडणार आहे. रेल्वे स्टेशन विक्रीला काढण्याचा भाजपचा डाव हाणून पाडल्याचेही काँग्रेसने म्हटले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि शहराचे माजी महापौर ड. किशोर शेळके यांनी सांगितले की, जाहीरनामा हा पक्ष आणि जनतेदरम्यानचा करार असतो. यापूर्वी सत्तेत असताना दिलेले सुशासन यावेळीही देऊ. त्या काळात केलेली विकासकामे जनतेसमोर मांडली जातील. जिल्ह्यात पक्षाचे दोन आमदार, राज्याच्या सत्तेतील सहभाग आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांकडे असलेली राज्याच्या तिजोरीची चावी या सर्व बाबी अमरावतीकरांच्या हितासाठी महत्त्वाच्या ठरतील.शिवसेना (उबाठा गट) जिल्हाप्रमुख पराग गुडधे म्हणाले की, सत्ताधाऱ्यांकडून शहरातील मैदाने गिळंकृत केली जात आहेत. याला आळा घालण्याचे काम पक्ष करेल. पार्किंग झोन, हॉकर्स झोन आणि स्वच्छतेच्या मुद्द्यांवर आम्ही जनमताचा कौल मिळवणार आहोत. शिवसेनेचे (शिंदे गट) कॅप्टन अभिजीत अडसूळ यांच्या मते, त्यांचा जाहीरनामा अंतिम टप्प्यात असून तो ६ जानेवारीनंतर अमरावतीकरांपर्यंत पोहोचेल.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकले

### झाडाची पूजा करणाऱ्या महिलेवर निशाना



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ परतवाडा,** घरापासून काही अंतरावर असलेल्या संतोषनगरमधील तुळजा भवानी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर, बेलपत्राच्या झाडाची पूजा करीत असताना एका महिलेचे लुटारूंनी २८ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले. रविवारला सकाळी ही धक्कादायक घटना परतवाड्यात घडली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे आणि फरार आरोपींचा शोध सुरु आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परतवाडा पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी रोहिणी प्रशांत उर्फ बाबा चावरे ही नेहमीप्रमाणे तिच्या बंगल्यासमोरील झाडाला प्रार्थना करत असताना दोन तरुण तिच्या घरासमोर थांबले. महिलेला वाटले की ते कोणाचे तरी घर शोधत आहेत, म्हणून तिने त्या दोघांना विचारले की ते कोणाला शोधत आहेत. दुचाकीवरून आलेल्या एका तरुणाने त्याचा मोबाईल फोन पाहत असल्याचे नाटक केले. महिलेला पुन्हा पूजा करताना पाहून, दोन्ही तरुणांनी मागून तिचे मंगळसूत्र हिसकावून घेतले.या झटापटीत महिला जागीच पडली. लुटारू मंगळसूत्र घेऊन पळून गेले. २८ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र अंदाजे ४ लाख रुपये किंमतीचे आहे. ही घटना दुपारी १:३० ते २:०० वाजेच्या दरम्यान घडल्याचे सांगितले जात आहे. चावरे यांचे घर तुळजा भवानी मंदिरा शेजारी आहे. चावरे यांच्या निवासस्थानी बसवलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्येही ही लुटमार कैद झाली आहे. घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली, पंचनामा केला आणि आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. दोन अज्ञात लुटारूविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे.





# अपक्षांना घरगुती वस्तू, फळे, वाहनांसह मिळाली अनेक चिन्हे

## प्रचारला झाली जोमाने सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती–** अमरावती येथे उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर आज, शनिवारी सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. यात राजकीय पक्षांच्या उमेदवारांना त्यांच्या पक्षाची चिन्हे मिळाली, तर अपक्ष उमेदवारांना विविध प्रकारची चिन्हे देण्यात आली. यामुळे मतदान यंत्रावर (ईव्हीएम) अक्षरशः 'डिपार्टमेंटल स्टोअर'सारखे चित्र दिसणार आहे.

भारतीय जनता पक्षाला कमळ, काँग्रेसला हात (पंजा), शिवसेनेला (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मशाल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (राकाँ) घड्याळ, शिवसेनेला धनुष्यबाण, बहुजन समाज पार्टीला हत्ती, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला (शरदचंद्र पवार) तुतारी वाजवणारा माणूस, प्रहारला बॅट, युवा स्वाभिमान पार्टीला पाना, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रेल्वे इंजिन, ऑल इंडिया मजलिस इत्तेहादुल मुस्लिमीनला (एमआयएम) पतंग, इंडियन मुस्लिम लीगला




शिडी, समाजवादी पार्टीला सायकल, वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलिंडर आणि ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकला सिंह ही राखीव निवडणूक चिन्हे मिळाली आहेत.

याउलट, अपक्ष उमेदवारांना मागणीनुसार विविध प्रकारची चिन्हे मिळाली आहेत. यात दूरदर्शन संच, कंगवा, किटली, कप-बशी, जग, ऑटोरिक्षा यांसारख्या घरगुती वस्तूंचा समावेश आहे. एका प्रभागातील प्रत्येक उमेदवाराला भिन्न चिन्ह देणे आवश्यक असल्याने, ही विविधता दिसून येते.

याशिवाय, एअर कंडीशनर, रोड रोलर, ट्रॅक्टर, विजेरी (टॉर्च), सफरचंद, काडीपेटी, शिटी, नारळ, झाडू, नगारा, पेटी (संदूक), शिवणयंत्र, पांगुळगाडा, संगणक आणि फळा अशी अनेक चिन्हेही मतदान यंत्रावर दिसणार आहेत.

महापालिकेचे मतदान १५ जानेवारी रोजी होणार आहे. यावेळी मतदारांपुढे येणाऱ्या मतपत्रिकेवर (ईव्हीएम) उमेदवारांचा क्रम निश्चित करण्यात आला आहे. सर्वात वर भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या आणि राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेल्या राजकीय पक्षांच्या उमेदवारांची नावे असतील. त्यानंतर भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या इतर राज्यातील (महाराष्ट्राव्यतिरिक्त) राज्यस्तरीय पक्षांचे उमेदवार असतील. तिसऱ्या टप्प्यात राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेल्या अमान्यताप्राप्त पक्षाचे उमेदवार असतील, तर शेवटच्या टप्प्यात अपक्ष उमेदवारांची नावे दिसतील.

# वचननामा नव्हे 'वाचून'नामा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ठाकरे बंधूंवर खोचक टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई–** ठाकरे बंधूंनी जाहीर केलेला वचननामा नव्हता तर वाचूननामा होता, अशी खोचक टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली. भाजप-शिंदेसेना-आरपीआयच्या उत्तर मुंबईतील ४२ उमेदवारांच्या प्रचारासाठी कांदिवली (पश्चिम) येथील गोरसवाडी मैदानात मुख्यमंत्र्यांची सभा झाली.

वचननामा प्रसिद्ध करण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र बसले होते तेव्हा ते एकमेकांमध्ये काहीतरी बोलत होते. तेव्हा ते काय बोलत असावेत, याची माहिती काढली तर ते 'झूठों ने झूठों से कहा सच बोलो. अरे भाई, दो भाई का ऐलान हुआ सच बोलो. घर के अंदर झूठों की एक मंडी है, दरवाजा पर लिखा है सच बोलो' असे बोलत असल्याचे ते म्हणाले. मुंबईत २५ वर्षे काम केल्यानंतरदेखील नव्याने पुन्हा त्याच त्याच गोष्टी सांगताना जनाची नाही तर मानाची तरी वाटली पाहिजे, अशीही टीका त्यांनी केली.



'हा प्रीतिसंगम नाही तर भीतिसंगम असल्याचा टोला त्यांनी लगावला. ही युती म्हणजे कन्फ्युजन आणि भ्रष्टाचाराची युती आहे. विरोधकांचे विकासावर एकही भाषण दाखवा, मी दोन हजार रुपयांचे बक्षीस देईन, असे आव्हान त्यांनी दिले. मुंबईच्या माजी महापौर शुभा राऊळ यांनी यावेळी भाजपमध्ये प्रवेश केला.

'२० वर्षं झाली, आता जेलमधून बाहेर आल्यासारखं वाटतंय,' असे राज ठाकरेंनी म्हटले. त्यावर राज 'मातोश्री'वरून 'शिवतीर्था'वर गेले, मग शिवतीर्थ जेल समजायचं का? असा खोचक सवाल त्यांनी केला. 'तुम्हाला जेलमध्ये कोणी पाठवलं? हे तरी सांगितलं पाहिजे. तुम्ही कोणत्या गुन्ह्यात जेलमध्ये गेला होतात? मग आता शिक्षा संपली का?' असे प्रश्नही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे यांना विचारले.

**मिनी जाहीरनाम्याची खिल्ली**

आदित्य आणि अमित ठाकरे यांनी मिनी जाहीरनाम्यात मुंबईत चांगली शौचालये नाहीत, असे म्हटले. यावर हा प्रश्न विचारणाऱ्यांनी घरी बाबा आणि काकांना हा प्रश्न विचारावा, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी आ. अतुल भातखळकर, आ. संजय उपाध्याय, आ. मनीषा चौधरी, आ. योगेश सागर, मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम, उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष दीपक तावडे, गोपाळ शेट्टी, भाई गिरकर, आदी उपस्थित होते.

**विकास प्रकल्पांचा पाढा**

कोस्टल रोड प्रकल्प, मेट्रो, उपनगरीय एसी बंद दरवाजाच्या लोकल, झोपडपट्टीमुक्त मुंबई, नवी मुंबई विमानतळाला मिळणारी कनेक्टिव्हिटी, एसटीपी प्रकल्पामुळे नद्यांना मिळणारी स्वच्छता, ठाणे- बोरिवली बोगदा अशा अनेक विकास प्रकल्पांचा रोड मॅप वाचून मुख्यमंत्र्यांनी दाखवला. आम्ही फक्त 'करून दाखवले'चे बोर्ड लावत नाही; तर त्यांची जिवंत स्मारके मुंबईकरांसमोर असल्याचेही त्यांनी सांगितले.

## भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा

# तरुणांनी भावनेपेक्षा विचारांना प्राधान्य द्यावे

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर



### सत्यपाल महाराज, अजय देहाडे, कडूबाई खरात यांनी भरला उपस्थितांमध्ये जोश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती–** तरुणांनी क्षणिक भावना किंवा उत्तेजनाला बळी न पडता शिक्षण, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधावा. विचारांवर आधारित कृतीच समाजाला योग्य दिशा देऊ शकते.समाजाच्या सकारात्मक परिवर्तनात तरुणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून त्यांनी भावनेच्या भरात न वाहता विचारपूर्वक वाटचाल करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले. सायन्सकोर मैदानावर आयोजित भीमा कोरेगाव शौर्यदिन मानवंदना कार्यक्रमात ते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान हे विवेक, समता आणि न्यायावर आधारित आहे. त्या विचारांचा अंगीकार केल्यास समाजात शांतता आणि प्रगती नक्की साधता येईल.भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या निमित्ताने आयोजित हा कार्यक्रम तरुणांमध्ये वैचारिक जागृती निर्माण करणारा ठरला, असेही जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नमूद केले.भीमा कोरेगाव विजयस्तंभ मानवंदना कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून सिद्धनाक महार याचे बारावे वंशज मिलिंद इनामदार हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मिरज येथील समशेर नदाब, पूनम गायकवाड, सतीश नाईक,शफी भाई,गौतम बनसोड,कृष्णराव वानखडे, बी.आर. धाकडे,अनिल हिरेकन,बी.एम. वानखडे, सुदेश वासनकर,धर्माजी वंजारी,अरुण आठवले, डॉ. लोंधे,राजू झोडापे,बन्सी भटकर, कपिल धवणे आदी मान्यवर मंडळी धम्मपिठावर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या मनोगतानंतर सामाजिक चळवळीत योगदान देणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, सामाजिक कार्यकर्त्या रजिया सुलताना,तपोवन चे अध्यक्ष डॉ.सुभाष गवई,अनाथांच्या आई कुमुदिनी इंगळे,विरपिता धनंजय गुळदेकर, लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घर खरेदी करतांना महत्वाची भूमिका बजावणारे रमेश कटके, गोरगरिबां चा निशुल्क इलाज करणाऱ्या डॉ.पुष्पा थोरात,योगगुरू राजू डांगे, सामाजिक चळवळीत योगदान देणारे अनिल बागडे व मंदाकिनी बागडे, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी अशोकराव खंडारे यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून लाभलेले मिलिंद इनामदार आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, भीमा कोरेगावचा शौर्यदिन हा केवळ इतिहासाची आठवण करून देणारा नाही, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देणारा आहे.आपण कोणत्याच क्षेत्रात कमी नाही, कमी असल्याची भावना मनात ठेवणे हेच पराभवाचे कारण ठरते. आत्मविश्वास, शिक्षण आणि संघटित प्रयत्नांच्या बळावर आपण कोणतीही उंची गाठू शकतो.भीमा कोरेगावनंतर एवढ्या व्यापक स्वरूपात शौर्यदिनाचा जागर अमरावतीत होत आहे, ही केवळ उत्सवाची नव्हे तर स्वाभिमानाची ओळख आहे. ही ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, असेही इनामदार म्हणाले. यावेळी कार्यक्रमाला जिल्ह्यातील हजारो अनुयायी उपस्थित होते. समाजभूषण पुरस्कारानंतर समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच अजय देहाडे व कडूबाई खरात यांच्या गायनाच्या कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये नवा जोश निर्माण केला होता.

# डेहणी शेतशिवारामध्ये बिबट्याने झाडावर केली माकडाची शिकार

## तिवसा तालुक्यात बिबट्याचा वावर



**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ तिवसा** शेंदूरजना बाजार, शिरजगाव मोझरी नंतर आता बिबट्याने निंभोरा मार्गे डेहणी शेतशिवारात धाव घेत झाडावर वास्तव्यास बसलेल्या माकडाची शिकार करून ठार केले आहे. ही घटना रविवारी सकाळी उघडकीस आल्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तिवसा तालुक्यात बिबट्याचा वावर सुरू असून, कुठे ना कुठे तो धाव घेत प्राण्यांची जीवितहानी करीत आहे. शिरजगाव मोझरी येथे बिबट्याने चांगलाच धुमाकूळ घातल्यानंतर त्याने निंभोरा-डेहणी शेतशिवारात धाव घेतली आहे. तेथील निलेश राहान यांच्या शेतातील आंब्याच्या झाडावर रात्रीच्या अंधारात बसलेल्या माकडाच्या कळपावर बिबट्याने झडप घालून त्यातील एका माकडाची शिकार करून त्यास ठार केले. शनिवारी सकाळी शेतकरी निलेश राहान हे शेतात गेले असता त्यांना हा प्रकार दिसून आला. त्यांनी याबाबत वनविभागाला माहिती दिली असता कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# धामणगावात बिरसा मुंडा कलश यात्रेचे जल्लोषात स्वागत

## आ .अडसड,नगराध्यक्ष, रोठे यांनी दिल्या शुभेच्छा

**दि.५ धामणगाव रेल्वे**
१३थोर आदिवासी स्वातंत्र्यसैनिक, जननायक आणि समाजसुधारक बिरसा मुंडा यांच्या कलश यात्रेचे धामणगावात जल्लोषात स्वागत करण्यात आले आमदार प्रताप अडसड,नगराध्यक्ष अर्चना रोठे अडसड यांनी या यात्रेला शुभेच्छा दिल्या

क्रांतिकारी बिरसा मुंडा यांचे विचार घराघरात पोहोचावे यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने विदर्भातील धारणी ,सिंदखेड राजा व कचरागड येथून कलश यात्रा काढण्यात आली या यात्रेत बिरसा मुंडा यांचे जन्मस्थान असलेले झारखंडमधील




उलिहातू येथून आणलेली माती या कलशा मध्ये आहेत. ही कलश यात्रा १ ते ८ जानेवारी पर्यंत गडचिरोली येथे पोहोचणार आहे.धारणी येथून निघालेली कलश यात्रा रविवारी धामणगाव दत्तापूर येथे पोहोचली यावेळी आमदार प्रताप अडसड, नगराध्यक्ष अर्चना रोठे अडसड नगरसेवक विलास बुटले यांनी या यात्रेला शुभेच्छा दिल्या या यात्रेचे स्वागत नगरसेविका सीमा पेंदाम, आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्ता मोहन राऊत,सीमा सडमाके, जया किन्नाके ,पापिता कंगाले,संगीता मडावी, रुपाली कंगाले, रजनी पेंदाम, विजय सिडाम, मनोज वरखडे ,शुभम मडावी यांनी केले या यात्रेत सहभागी असलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे यात्रा प्रमुख संदीप उरकुडे ,योगेश शेळके, ऋषभ गोहने, ओम धोटे, श्रवण देशपांडे, सचिन मेटगे ओम मोरे, शिव पांढरे यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे आदिवासी बांधवांनी पूजन केले व कलशाचे दर्शन घेतले.

# सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्काराने रामदयाल कोठार सन्मानीत

## स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचा उपक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नांदगाव पेठ–** नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार २०२६, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलींना उच्च शिक्षण देणारे नांदगाव पेठ येथील श्री.रामदयाल भारत कोठार यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभाचे अध्यक्षस्थानी स्व. दत्तात्रय पुसदकर शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्षा श्रीमती वृषालीताई पुसतकर या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नांदगाव पेठ येथील माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्या अलका मेश्राम मॅडम या उपस्थित होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर श्री अनुराग वारेकर, पुरस्काराचे मानकरी श्री रामदयाल कोठार,त्यांच्या सौभाग्यवती सौ. रेखाताई कोठार आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे उपस्थित होते. मुलगा -मुलगी असा कोणताही भेद न करता अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मुलींना उच्च शिक्षण देण्यासाठी धडपड करणाऱ्या पालकांना दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने आदर्श पालक पुरस्कार सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो. ३००१/- रुपयांच्या धनादेश, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असून २०१५ पासून सदर पुरस्कार महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्या पालकांना देण्यात येतो. यावर्षीच्या पुरस्कार वितरण समारंभाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुरस्कार वितरण समितीचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी पुरस्कार वितरणामागची भूमिका प्रास्ताविकातून विशद केली. त्यानंतर श्री.रामदयाल कोठार यांना श्रीमती वृषाली ताई पुसतकर व इतर पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ.अलका मेश्राम मॅडम यांनी आपल्या भाषणातून महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करीत महाविद्यालयातील मुलींनी कोणत्याही परिस्थितीत न डगमगता खंबीरपणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडीत पुढे जावे असा मोलाचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कु. मोहिनी रामदयाल कोठार यांनी आपल्या पालकाच्या वतीने मनोगत व्यक्त करीत पुरस्कारासाठी महाविद्यालयाचे आभार मानले. सदर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे सन्माननीय अध्यक्षा श्रीमती वृषालीताई पुसतकर, उपाध्यक्ष निदानजी बारस्कर, सचिव श्रीकृष्णजी बाळापुरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वरजी हिवसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सौ. सुनीता बाळापुरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विकास अडलोक यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. डॉ.पी. आर. जाधव ,डॉ. राजेश ब्राह्मणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ. सुभाष पवार, डॉ. पंकज मोरे, रेखाताई पुसतकर, दिलीप पारवे, विनायक पावडे, अनिल शेवतकर, राहुल पांडे, कोठार महाराज आणि महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

# धामणगावात पहिल्यांदा उभे राहणार एक कोटीचे आदिवासी भवननिधी मंजूर

## आ. प्रतापदादा अडसड यांनी मानले पालकमंत्र्याचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धामणगाव रेल्वे**
आदिवासीं समाजाने शतकानुशतकं जपलेली आपली संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली अधिक वृंदगत व्हावी सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि भावी पिढ्यांना त्याची ओळख करून देण्यासाठी जूना धामणगावात पहिले एक कोटींचे आदिवासी सांस्कृतिक भवन आ. प्रतापदादा अडसड यांच्या प्रयत्नामुळे उभे राहणार आहे.धामणगाव रेल्वे मतदारसंघात आदिवासी बांधवांची संख्या अधिक प्रमाणात आहे प्रत्येक निवडणुकीत आदिवासी बांधव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असल्याने आमदार प्रतापदादा अडसड यांनी जिल्हा नियोजन समिती मधून एक कोटी रुपयाचे आदिवासी सांस्कृतिक भवन मंजूर करून घेतले हे भवन



जूना धामणगाव येथे उभारण्यात येणार आहे या भवनांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना एकत्र येऊन विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम घेता येणार आहे. जिल्हा नियोजन समिती २०२५-२६ अंतर्गत या आदिवासी सांस्कृतिक भवनासाठी एक कोटीचा निधी मंजूर केल्याने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानत आगामी काळात चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर येथे ही आदिवासी सांस्कृतिक भवन उभारण्याचा आपला माणस असल्याचे आमदार प्रतापदादा अडसड यांनी सांगितले .दरम्यान एक कोटी रुपयाचे आदिवासी सांस्कृतिक भवन मंजूर केल्याने धामणगाव रेल्वे तालुक्यातील आदिवासी बांधवांनी आ.अडसड यांचे आभार मानले आहे.

# ‘लाडक्या बहिणींसह आता लखपती’ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महत्त्वपूर्ण विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अकोला**

राज्यात सर्वाधिक चर्चा असते ती लाडक्या बहीण योजनेची. मोठ्या संख्येने महिला या योजनेच्या लाभार्थी आहेत. निवडणुका डोळ्यापुढे ठेऊन सत्ताधाऱ्यांनी ही योजना सुरू केल्याची टीका विरोधकांकडून केली जाते. या योजनेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मोठे व अत्यंत महत्त्वपूर्ण विधान केले.

अकोल्यात महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचाराचे रणशिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी जाहीर सभेतून फुंकले. पालकमंत्री ड.आकाश फुंडकर, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, अमोल मिटकरी, माजी राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, डॉ. दशरथ भांडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. या सभेमध्ये मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजनेवरही भाष्य केले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ‘‘विधानसभा निवडणुकीत महायुतीला २३२ जागा मिळाल्या. राज्यात सत्ताधाऱ्यांना एवढ्या जागा मिळाल्या की ते आता लाडकी बहीण योजना बंद करतील, असा अपप्रचार विरोधकांकडून केल्या गेला. देवाभाऊ जोपर्यंत मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. केंद्र शासनाने राज्याला एक कोटी लखपती दिदी तयार करण्याचे लक्ष्य दिले आहे. आतापर्यंत ५० लाख लखपती दिदी तयार झाल्या. आगामी काळात एक कोटींचे लक्ष्य पूर्ण केले जाणार आहे.

**बचत गटातील महिलांसाठी ‘उमेद’; कोणीही बेघर राहणार नाही**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेतून ३० लाख घरे उपलब्ध करून दिले आहेत. जागेची अडचण होती. त्यामुळे राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला. शहरातील रहिवासी अतिक्रमणाला मालकी हक्काचा पट्टा देणार आहोत. त्यामुळे सर्वांचे पक्के घराचे स्वप्न साकार होईल. यापुढे कोणीही बेघर राहणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.बचत गटातील महिलांसाठी राज्य शासनाने मोठा निर्णय घेतला. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल उघडले जाणार आहेत. त्या माध्यमातून बचत गटातील महिलांना आपले उत्पादन विकता येईल. अकोल्यातील बचत गटातील महिलांसाठी उमेद मॉल उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## नेहमीपेक्षा मोठा आणि तेजस्वी ‘सुपरमून’



नवीन वर्षाची सुरुवात होताच आकाशात एक अद्भूत दृश्य पाहायला मिळाले. शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी वर्षातील पहिला ‘सुपरमून’ आपल्या पूर्ण तेजाने आकाशात प्रकट झाला. या पौर्णिमेच्या चंद्राला पारंपारिक भाषेत ‘वुल्फ मून’ असे संबोधले जाते.
**छायाचित्र - सागर राणे ( सहायक छायाचित्रकार जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती)**

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या रोडशोमध्ये आ.तायडे राहिले आघाडीवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



अमरावती शहरात रविवारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भव्य रोडशोचे आयोजन करण्यात आले. या रोडशोला नागरिकांकडून उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ठिकठिकाणी नागरिकांनी फुलांची उधळण करत मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत केले.या रोडशो दरम्यान भाजपचे आमदार प्रवीण तायडे हे रॅलीसोबत प्रत्यक्ष धावत सहभागी झाले. त्यांनी कार्यकर्त्यांसह देवेंद्र फडणवीस आगे बढो च्या जोरदार घोषणा देत संपूर्ण वातावरण भारावून टाकले. आमदार तायडे यांच्या ऊर्जावान सहभागामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले होते हे विशेषरोडशोच्या मार्गावर भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ढोल-ताशे, फलक, भगवे झेंडे आणि घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. महिलांसह तरुणांचा सहभाग लक्षणीय ठरला.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा रोडशो भाजपच्या शक्तिप्रदर्शनाचा महत्त्वाचा भाग मानला जात आहे. अमरावतीत भाजपने प्रचाराचा वेग वाढविल्याचे चित्र या रोडशोमधून स्पष्टपणे दिसून आले असून, पक्ष संघटन मजबूत असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## शिक्षकांच्या पगारावर टांगती तलवार

### १५ जानेवारीपर्यंत संचमान्यता प्रक्रिया अनिवार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**




येत्या १५ जानेवारीपर्यंत सर्व शाळांना संचमान्यतेची प्रक्रिया अनिवार्य करण्यात आली असून त्यानंतर राहिलेल्या शाळांचा पगार रोखण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले आहे. राज्यातील शिक्षक भरतीप्रक्रियेत महत्त्वाचा बदल करत शाळांच्या संचमान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर म्हणजे मे २०२६ पर्यंत संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भातील शासननिर्णय प्रसिद्ध केला असून, या निर्णयामुळे येत्या काळात शिक्षक भरतीमधील पदांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून करण्यात येते. सध्या या भरतीप्रक्रियेत एकूण मंजूर पदांपैकी ८० टक्क्यांपर्यंत रिक्त पदे भरण्याची तरतूद आहे. शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ च्या निकालाच्या आधारे ही पदभरती प्रक्रिया सुरू आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात शिक्षक सेवानिवृत्त होत असतात, तसेच संचमान्यतेनुसार नवीन रिक्त पदे उपलब्ध होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये यासाठी वेळेवर शिक्षक उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार कोणत्याही शाळेत १० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त ठेवता येत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व स्तरांवरील शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अखेर संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन, अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ मधील गुणांच्या आधारे शिक्षक पदभरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शिक्षण विभागातील अधिकार्यांच्या माहितीनुसार, आतापर्यंत संभाव्य रिक्त पदांचा विचार न केल्यामुळे अनेक पदे भरतीतून वगळली जात होती आणि ती रिक्तच राहत होती. नव्या निर्णयामुळे ही पदे भरती प्रक्रियेत समाविष्ट होणार असून, त्यामुळे शिक्षक संख्येत वाढ होणार आहे.

दरम्यान, शाळांतील आधार वैध विद्यार्थ्यांची २० ऑक्टोबर २०२५ रोजीची संख्या ग्राह्य धरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी संचमान्यता निश्चित करण्यात आली आहे. ही संचमान्यता शिक्षणाधिकार्यांच्या लॉगिनला उपलब्ध करून देण्यात आली असून, तपासणी करून डिजिटल स्वाक्षरीनंतर शाळांना उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पायाभूत पदांबाबत अडचणी असलेल्या शाळांनी तातडीने प्रतिसाद द्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. सर्व संचमान्यता १५ जानेवारीपर्यंत शाळांना देणे बंधनकारक असून, त्यानंतर २०२५-२६ ची संचमान्यता न झालेल्या शाळांचे वेतन देण्यात येणार नाही, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

## प्रहार, कॉंग्रेस कार्यकर्ते भाजपमध्ये

### आ. प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चांदुर बाजार**

तालुक्यातील आसेगाव सर्कलमधील प्रहार व कॉंग्रेस पक्षांच्या शेकडो कार्यकर्त्यांनी आ. प्रवीण तायडे यांच्या सर्वसमावेशक विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवत प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे. ऐन जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांसमोर प्रहार, कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये पक्ष प्रवेश झाल्याने हा पक्ष प्रवेश विशेष मानला जात आहे.

केंद्रात व राज्यात सर्वत्र भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रविचाराचे सर्वसमावेशक सरकार असून देशाची विकासाकडे मोठी वाटचाल सुरू आहे. विकासाच्या राजकारणामुळे भारतीय जनता पार्टीला सातत्याने मिळणारा जनाधार पाहता, इतर पक्षातून भाजपामध्ये प्रवेश करणार्या नेत्यांचे व कार्यकर्त्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढतच आहे. याच पृष्ठभूमीवर, आसेगाव सर्कलमधील शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी आ. प्रवीण तायडे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला आहे. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर भारतीय जनता पार्टीचे हात अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने हा प्रवेश करण्यात आला, असा विश्वास उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. भाजप प्रवेशाच्या कार्यक्रमांमध्ये भाजपचे जिल्हा सचिव नरेश बर्वे प्रामुख्याने उपस्थित होते.

## अमरावती-मुंबई विमानसेवेच्या वेळेत पुन्हा बदल आता दुपारी १२.०५ वाजता मुंबईकडे झेपावेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**




अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा आता पूर्ववत आठवड्यातून चार दिवस सुरू झाली असली, तरी वेळेत पुन्हा एकदा बदल करण्यात आला आहे. उद्या ५ जानेवारी रोजी मुंबईहून दुपारी १२.०५ वाजता विमान अमरावतीकडे झेपावेल. दुपारी १.५० वाजता अमरावतीत पोहचेल. त्यानंतर दुपारी २.१५ वाजता मुंबईसाठी उड्डाण घेईल आणि दुपारी ४ वाजता मुंबईला पोहचेल. पण, ७ जानेवारीपासून पुन्हा एकदा सकाळच्या सत्रात विमानसेवा सुरू होणार आहे.

ही विमानसेवा दाट धुक्याच्या समस्येमुळे १ ते १५ डिसेंबरदरम्यान बंद ठेवण्यात आली होती. त्यानंतर ती पूर्ववत सुरू करण्यात आली, तरी ती आठवड्यातून दोनच दिवस ठेवण्यात आली आणि वेळेतही बदल करण्यात आला होता. २ जानेवारीपासून आठवड्यातून चार दिवस विमानोड्डाण सुरू झाले आहे.

आता येत्या ७ जानेवारीपासून ते ३० जानेवारीपर्यंत विमानसेवेच्या वेळा या बदलण्यात आल्या आहेत. ७ तारखेपासून सकाळी ९.५५ वाजता मुंबईहून विमान उड्डाण घेईल आणि ११.४० वाजता अमरावती पोहचेल. अमरावतीहून दुपारी १२.०५ वाजता मुंबईकडे झेपावेल आणि १.५० वाजता मुंबईला पोहचेल. तर १ फेब्रुवारीपासून सकाळी ७.०५ वाजता अमरावतीकडे उड्डाण घेईल आणि ८.५० वाजता अमरावतीला पोहचेल. तर सकाळी ९.१५ वाजता मुंबईसाठी उड्डाण घेईल आणि १०.३० वाजता मुंबईला पोहचेल, अशी माहिती अलायन्स एअरच्या संकेतस्थळावरून देण्यात आली आहे. प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करण्यापूर्वी वेळेची खात्री करणे आवश्यक आहे.

## वाचन संस्कृतीस चालना : तिवसा वाचनालयाला कपाट व खुर्च्यांचे योगदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५तिवसा**

श्री राजर्षी शाहु महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा यांना बालिका दिनानिमित्त श्री रामदासजी पंत काका व श्री पांडुरंगजी खेडकर काका यांनी पुस्तकाची कपाट तसेच श्री चंदुभाऊ धुरजड व अनिलभाऊ देशमुख, बेलोरा यांनी खुर्च्या भेट स्वरूपात दिल्यात. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या सौ. आरतीताई राजेशजी वानखडे, छायाताई दंडाळे, अनिलभाऊ थुल, सचिनभाऊ राऊत यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच वाचनालयातर्फे श्री रामदासपंतजी देशमुख व पांडुरंगजी खेडकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सौ. आरतीताई वानखडे व छायाताई दंडाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला सुनिलभाऊ बहाद्दरपुरे, राजाभाऊ टेकाडे,अजयभाऊ गुल्हाने, ज्ञानेश्वरभाऊ कुर्हाडे, अविभाऊ शिंदे, सतीशभाऊ नंदनवार, जानरावजी मनोहर, हेमंतभाऊ निखाडे, प्रशिक भाऊ शापामोहन, सुनिलभाऊ घोरमाडे ,संदीप दहाट,मधुकरराव पिंगळे, सुरजभाऊ तंवर, भूषण मुंदाणे, दिपकभाऊ धानोरकर, प्रफुल भाऊ बनसोड, अजयभाऊ केणे, गोपालभाऊ फरकाडे,मंगेशभाऊ जगताप, अनिसभाऊ शेख,प्रथमेश गौरखेडे, अनिकेतभाऊ वानखडे राजाभाऊ देशमुख, सुमितभाऊ अनासाने, राहुल धडांगे, विजय बोन्द्रे,गणेश तरंगे व इतर वाचक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहनभाऊ भुसारी यांनी केले.

## कळमगाव ग्रामपंचायतीसमोर फुलली ५०० झाडांची आदर्श परसबाग

### सरपंच ॲड. शिवाजी वाघ यांच्या पुढाकाराने पडीत जागेला मिळाला हरित श्वास!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५चांदूर रेल्वे**



चांदूर रेल्वे तालुक्यातील कळमगाव ग्रामपंचायत समोरील वर्षानुवर्षे पडीत असलेली जागा आज पर्यावरण संवर्धनाचा आदर्श नमुना ठरत आहे. ग्रामपंचायतचे सरपंच ॲड. शिवाजी वाघ यांच्या पुढाकाराने या जागेवर तब्बल ५०० फळझाडांची परसबाग फुलविण्यात आली असून, गावाच्या सौंदर्यात व पर्यावरणात नवा अध्याय लिहिला गेला आहे.

या परसबागेत पेरू, चिंच, कवठ यांसारखी दीर्घायुषी व उपयुक्त फळझाडे लावण्यात आली असून, येत्या काळात ही जागा केवळ हिरवळच नव्हे तर ग्रामस्थांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे. विकास म्हणजे केवळ सिमेंट नाही, तर हिरवळही तितकीच गरजेची हा संदेश या उपक्रमातून ठळकपणे पुढे आला आहे.या उपक्रमाला रोजगारसेवक भीमचंद दुर्योधन, उपसरपंच अंकुश आठवले, सचिव निलेश आष्टीकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य संजय इंगळे, किशोर ढगे, मंगला गजभिये, नलुबाई मेश्राम, लता जगताप यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून पडीत जागेचे रूपांतर आज हरित वैभवात झाले आहे.कळमगाव ग्रामपंचायतीचा हा उपक्रम परिसरातील इतर ग्रामपंचायतींसाठीही एक प्रेरणादायी आदर्श ठरत असून, पर्यावरण रक्षणाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल निश्चितच भविष्यासाठी फलदायी ठरणार आहे. या परसबागेच्या देखभालीसाठी मजुरांची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे.

## राज्यस्तरीय जिरेमाळी समाज उपवर युवक-युवती परिचय संमेलन उत्साहात संपन्न; मतदान जनजागृतीची शपथ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

जिरेमाळी समाज बहुउद्देशीय संस्था, अमरावती व अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय जिरेमाळी उपवर युवक-युवती परिचय संमेलन २०२५ कांचन रिसॉर्ट, अमरावती येथे उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. राज्यभरातील उपवर युवक-युवती व त्यांच्या पालकांची मोठ्या संख्येतील उपस्थिती लाभल्याने संमेलन भव्य ठरले.संमेलनाचे उद्घाटन नांदगाव खंडेश्वरच्या नगराध्यक्षा सौ. प्राप्तीताई विलासराव मारोटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व माता सावित्री वंदनेने करण्यात आले. अध्यक्षस्थानी महात्मा फुले विकास मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. वसंतराव खैरनार होते. व्यासपीठावर समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.उद्घाटनप्रसंगी नाशिक येथील गायत्री उद्योग समूहाचे चेअरमन यांनी बदलत्या काळात योग्य जोडीदार निवडीसाठी अशा व्यासपीठांचे महत्त्व विशद केले. समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी माळी भवन उभारण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. अध्यक्षीय भाषणात वसंतराव खैरनार यांनी युवकांनी संकटांना धैर्याने सामोरे जात प्रगती साधावी, तसेच अहंकार टाळून समाजाशी नाळ जपावी, असे आवाहन केले.समाजातील युवा नेते प्रकाश मारोटकर यांनी प्रत्येकाने समाजासाठी योगदान देण्याचे आवाहन करत सावित्रीबाई फुले यांचे विचार आत्मसात करण्याचे सांगितले. पुढील सत्रात उपवर युवक-युवतींनी आपला परिचय करून देत शिक्षण, व्यवसाय व अपेक्षा मांडल्या. इंजिनिअर, डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी व व्यावसायिक युवक-युवतींचा सहभाग विशेष ठरला.यावेळी ‘अनुबंध’ या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. तसेच स्वीप मोहिमेंतर्गत मतदान जनजागृतीची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज सपकाळ यांनी तर आभार पंकज सपकाळ यांनी मानले. समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संमेलन यशस्वी व संस्मरणीय ठरले.




# प्रभाग १९ साईनगरमध्ये युवा स्वाभिमानचा धुव्वादार शुभारंभ

## भाजप स्टार प्रचारक नवनीत राणा यांच्या हस्ते साई मंदिरात नारळ फोडून प्रचाराची सुरुवात






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १९, साईनगर येथे युवा स्वाभिमान पक्षाच्या प्रचाराचा भव्य आणि उत्साहपूर्ण शुभारंभ रविवारी पार पडला. माजी खासदार नवनीत रवी राणा यांच्या हस्ते साईनगर येथील साई मंदिरात नारळ फोडून प्रचाराची अधिकृत सुरुवात करण्यात आली. यावेळी युवा स्वाभिमान पक्षाचे अधिकृत उमेदवार सचिन ओंकारराव भेंडे (चिन्ह - पाना), उदय गुलाब पर्वतकर (चिन्ह - पाना) तसेच पक्षाच्या समर्थित उमेदवार गौरी अमोल इंगळे (चिन्ह - शिट्टी) आणि सरिता सौरभ मालानी यांच्या प्रचाराचा श्रीगणेशा झाला.या कार्यक्रमाला प्रभागातील हजारो नागरिकांची उपस्थिती लाभली. युवा स्वाभिमान पक्ष जिंदाबाद, पाना-पाना, विकासाचा बाणा अशा घोषणांनी साई मंदिर परिसर दणाणून गेला. नवनीत राणा यांनी महाआरती करून साईबाबांच्या चरणी उमेदवारांच्या विजयासाठी प्रार्थना केली. उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की, आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वाखाली साईनगरमध्ये विकासाची ठोस दिशा मिळाली असून, ती पुढे नेण्यासाठी युवा स्वाभिमानचे उमेदवार कटिबद्ध आहेत.उमेदवार सचिन भेंडे, उदय पर्वतकर व गौरी इंगळे यांनी नागरिकांशी संवाद साधत रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी रोजगाराभिमुख उपक्रमांना प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हेच आमचे भांडवल आहे, असे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमामुळे प्रभाग १९ साईनगरमध्ये युवा स्वाभिमान पक्षाच्या प्रचाराला वेग आला असून, संपूर्ण प्रभागात पाना-पाना सर्वांगीण विकासाचा बाणा हा नारा गाजू लागला आहे.

# गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवणार

## अमरावतीत रवी राणा चा एल्गार; भाजप उमेदवारांवर थेट हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आमदार रवी राणा यांनी आक्रमक भूमिका घेत राजकीय वातावरण तापवले आहे. लोकसभा निवडणुकीत नवनीत राणा यांच्या विरोधात प्रचार करणारे आणि भाजपसोबत गद्दारी करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवणार, असा थेट इशारा देत रवी राणा यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

आगामी निवडणुकीत निर्णायक भूमिका बजावण्याचा दावा केला आहे.लोकसभा निवडणुकीत झालेल्या कथित गद्दारीचा बदला महापालिका निवडणुकीत घेतला जाईल, असे सांगत नवनीत राणा यांनी काल साईनगर परिसरात युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवाराच्या समर्थनार्थ प्रचार केला. या प्रचारादरम्यान रवी राणा यांनी भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांच्यावरही थेट निशाणा साधत अंतर्गत नाराजी उघड केली.नवनीत राणा यांच्या लोकसभा निवडणुकीत धडझ चे उमेदवार सचिन भेंडे यांनी प्रचंड मेहनत घेतली, जीव ओतून काम केले. तरीही गद्दारी करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही, असे स्पष्ट शब्दांत रवी राणा म्हणाले. ज्यांनी ज्यांनी लोकसभा निवडणुकीत गद्दारी केली, त्यांच्या विरोधात आम्ही जाहीरपणे प्रचार करू, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.युवा स्वाभिमान पक्षाची ताकद अधोरेखित करताना रवी राणा म्हणाले, ज्या प्रभागात युवा स्वाभिमानचे उमेदवार मजबूत आहेत, त्या ठिकाणी भाजप आमच्यासोबत काम करेल. जिथे स्वाभिमानचे उमेदवार आहेत, तिथेच भाजपची ताकद उभी राहील. अमरावती महानगरपालिकेवर भाजपचाच महापौर बसेल, असा ठाम दावाही त्यांनी केला.युवा स्वाभिमानचे तब्बल ३० नगरसेवक निवडून येतील आणि निवडून आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार होईल, असा विश्वास रवी राणा यांनी व्यक्त केला. या आक्रमक वक्तव्यांमुळे अमरावतीतील राजकारण अधिकच तापले असून महापालिका निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे स्पस्ट झाले आहे.

# घरकाम करणाऱ्या महिला महापालिका निवडणूक प्रचारात घराघरात आरडाओरड, भांड्यांचा आवाज सुरू

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



सावधान महिलांनो. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता तुमच्या घरात तुम्हाला दहा दिवस घरकाम करणारी केर, कचरा काढणारी, झाडू, पोछा करणारी, धुणेभांडी करणारी महिला दिसणार नाही. त्याला कारण ही महिला आता सर्व पक्षीय उमेदवाराच्या प्रचारात ३०० ते ५०० रूपये रोजंदारीने कामाला लागली आहे. त्यामुळे आता या सर्व महिला सुटीवर गेल्या आहेत. दरम्याान घरकाम करणाऱ्या महिला प्रचारात गेल्याने घराघरात आरडा ओरड आणि भांडी वाजण्याचा आवाज सुरू झाला आहे.

महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. या रणधुमाळीत निवडणुक कुठलीही असो प्रचारासाठी आता कार्यकर्त्यांची तसेच पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची संख्या रोडावत चालली आहे. या कार्यकर्त्यांची जागा रोजंदारीने घरोघरी धुणीभांडी, घरकाम करणाऱ्या महिलांनी घेतली आहे. अमरावती शहरात बहुसंख्य घरात धुणे, भांडी तसेच घरकाम करणाऱ्या महिला संख्येने अधिक आहेत. मात्र या सर्व महिला आता सर्वपक्षीय उमेदवारांच्या निवडणुक प्रचारात गुंतलेल्या आहेत. या महिलांना उमेदवारांकडून किमान ३०० ते ५०० रूपये रोजी दिली जाते. या महिला सकाळी नऊ ते सायंकाळी सहा या वेळेत उमेदवारांची प्रचार पत्रके घरोघरी जावून वाटप करतात, उमेदवारांच्या रॅलीत झेंडे घेवून सहभागी होतात. त्यामुळेच ४ जानेवारी पासून बहुसंख्य घरातील घरकाम करणाऱ्या महिला सुटीवर गेल्याचे चित्र दिसत आहे.त्यामुळे घरातील महिलांनाच कामे करावी लागत आहे. या रोजंदारीने काम करणाऱ्या महिलांकडे खास प्रकारची एक शैली आहे. या महिला सकाळी एका उमेदवाराचा तर दुपारी दुसऱ्या आणि सायंकाळी तिसऱ्या म्हणजे एकाच दिवशी भाजप, काँग्रेस व शिवसेना अशाही उमेदवारांचा प्रचार करू शकतात. कारण त्याच्या जवळच्या पिशवीत तीन ते चार पक्षाचे झेंडे हमखास असतातच. घरकाम करणाऱ्या महिला सुटीवर गेल्याने आता घरची धुणीभांडी घरच्याच महिलांना करावी लागत आहेत. या महिलांची मागणी इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की अनेकांना प्रचारासाठी महिला मिळणे कठीण झाले आहे. दरम्यान या रोजंदारीने काम करणाऱ्या महिलांना दिवसाच्या रोजी सोबतच चहा, नास्ता आणि सायंकाळी वेळ पडली तर जेवणाची देखील व्यवस्था उमेदवारांकडून केली जाते. तेव्हा या घरकाम करणाऱ्या महिला घरी कमी आणि प्रचारात अधिक दिसून राहिल्या आहेत.दरम्याान घरकाम करणाऱ्या महिला प्रचारात गेल्याने घराघरात आरडा ओरड सुरू झाली आहे. प्रत्येक उमेदवाराची प्रभागातून निघालेली रॅली बघितली तर या सर्वांचा अंदाज यायला आता सुरुवात झाली आहे. या महिलांना रोड शो मध्ये सहभागी होण्यासाठी जाण्यायेण्याची खास व्यवस्था होती. त्यानंतर एका ठिकाणी चहा नास्ता व रोजीचे पैसे देखील वाटप करण्यात आले.

# स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेला थाटात सुरुवात

## सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी चांगल्या उपक्रमाची गरज - हेमंत काळमेघ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी चांगल्या उपक्रमाची गरज आहे. वकृत्वातून भाऊसाहेब घडले. भाऊसाहेबांना अपेक्षित असणारे कार्य या स्पर्धेच्या माध्यमातून होत आहे असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांनी केले.

स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. सोमवार,दि.५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी अकरा वाजता वाजता डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती येथे राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेला थाटात सुरुवात झाली.शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्ताने आयोजित ही स्पर्धा 'भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आयोजित करण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला प्रा. डॉ. एकनाथराव तट्टे, प्रा. डॉ.स्वप्नील इंगोले, प्रा. बायदनी, आजीवन सभासद आनंदराव देशमुख, पप्पू उर्फ मंगेश पाटील,प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, संयोजक प्रफुल्ल घवळे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना हेमंत काळमेघ म्हणाले की भाऊसाहेबांसारखे रोल मॉडेल डोळ्यासमोर ठेवून तरुणांनी आपल्या वेळेचे नियोजन करायला पाहिजे. भाऊसाहेब वक्तृत्वातून घडले. त्यांना अपेक्षित असणारे विद्यार्थी अशा प्रकारच्या स्पर्धेतून निर्माण होत आहे. आजची तरुणाई भरकटलेली असताना त्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन अशा प्रकारच्या उपक्रमातून होते म्हणून हीच खरी महापुरुषांना श्रद्धांजली आहे असे यावेळी ते म्हणाले. प्राचार्य वर्षा देशमुख यांनी स्वागत पर भाषण केले. प्रा डॉ.शितलबाबू तायडे यांनी परीक्षक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रास्ताविक वैशाली घवळे(गरकल)यांनी केले. संचालन प्रा.रत्नाकर शिरसाट तर आभार प्रदर्शन मयूर चौधरी यांनी केले. स्पर्धेत विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी विचार मांडणारे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील महाविद्यालयीन संघ सहभागी झाले. उशिरा रात्रीपर्यंत स्पर्धा सुरू होती.स्पर्धेचे थेट प्रक्षेपण फेसबुक व युट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले. स्पर्धेचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी प्रा.डॉ.विलास नांदुरकर यांची निवड करण्यात आली. विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले अभ्यासपूर्ण मत मांडून स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून अमरावतीकरांसाठी मोठी घोषणा!, 'आयटी पार्क' उभारणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**



महापालिका निवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असताना रविवारी अमरावतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'रोड शो'चे आयोजन करण्यात आले. पंचवटी चौकापासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप साईनगर येथील साईमंदिराजवळ झाला. मुख्यमंत्र्यांनी यावेळी अमरावती हे अत्यंत महत्वाचे शहर म्हणून विकसित करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत, पुढल्या काळात अमरावतीतील तरूणांसाठी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील (आयटी) गुंतवणूक आणली जाईल, अशी घोषणा पत्रकारांशी बोलताना केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अमरावती आणि संपूर्ण पश्चिम विदर्भामध्ये डॉ. पंजाबराव देशमुखांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. शिक्षणाचा प्रसार केला. आता अमरावतीत आयटी क्षेत्रातील उद्योग आले पाहिजेत, यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. अमरावतीत लवकरच 'आयटी पार्क' उभारले जाईल.

मुख्यमंत्री म्हणाले, अमरावतीकरांनी 'रोड शो'ला प्रचंड प्रतिसाद दिला, याचा मला आनंद आहे. अमरावती महापालिकेत यापुर्वी भाजपची सत्ता होती आणि आताही भाजपला पूर्ण बहुमत मिळणार आहे. अमरावतीच्या विकासासाठी आमच्या सरकारने अनेक योजना आणल्या. अमृत योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याची कामे केली जात आहेत. २१२ कोटी रुपयांचा रस्ते विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. अमरावतीत दक्षिण आशियातील सर्वात मोठी विमानोड्डाण प्रशिक्षण संस्था उभारली जात आहे. या प्रकल्पाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, टेक्स्टाईल पार्कमुळे येथील तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. आता पीएम-मित्र मेगा टेक्स्टाईल पार्कमुळे लाखो लोकांना रोजगार प्राप्त होणार आहे. अमरावतीत भुयारी गटार योजना पूर्ण करण्यासाठी २५६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. २०० कोटी रुपये अंबादेवी प्रकल्पासाठी मिळणार आहेत. छत्री तलाव, वडाळी तलाव सौंदर्यीकरणाची कामे आगामी काळात केली जाणार आहेत.

# दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी बोर्डाचा मोठा निर्णय

## लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या प्रक्रियेत महत्त्वाचा बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षेसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दहावी- बारावीच्या बोर्ड परीक्षेत कॉपी होणारच नाही, असे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी लेखी परीक्षेपूर्वी होणाऱ्या प्रात्यक्षिक परीक्षेतील बाह्य परीक्षकांची आता अदलाबदल केली जाणार आहे. खासगी स्वयंअर्थसहाय्यिता शाळांवरील शिक्षक अनुदानित शाळांमध्ये आणि तेथील शिक्षक स्वयंअर्थसहाय्यिता शाळांमध्ये बाह्यपरीक्षक म्हणून नेमण्याचा निर्णय बोर्डाने घेतला आहे.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक २३ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या दरम्यान होणार आहे. त्यानंतर १० फेब्रुवारीपासून लेखी परीक्षा सुरू होईल. दुसरीकडे, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक तथा तोंडी परीक्षा २ ते १८ फेब्रुवारीपर्यंत पार पडेल. त्यानंतर २० फेब्रुवारीपासून लेखी परीक्षा सुरू होणार आहे. दरम्यान, बोर्डाच्या परीक्षेवेळी कॉपी केसेस किंवा गैरप्रकार आढळल्यास आता त्या परीक्षा केंद्रांची मान्यता कायमची रद्द केली जाणार आहे. केंद्राला पक्के वॉल कंपाउंड, स्वच्छतागृह, पाण्याची सोय, प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे, अशा बाबींचा त्यात समावेश आहे.

एखाद्या केंद्राचे वॉल कंपाउंड पडलेले असल्यास त्या ठिकाणी लोखंडी जाळी मारायला सांगण्यात आले आहे. आता प्रात्यक्षिक परीक्षेपूर्वी ७ जानेवारीला बाह्य परीक्षकांचा उद्बोधन वर्ग घेतला जाणार आहे. त्यावेळी बाह्य परीक्षकांनी प्रात्यक्षिकावेळी कोणत्या बाबी तपासायच्या, याबद्दल मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षेवेळी प्रत्येक जिल्ह्यातील किमान १० टक्के शाळांना शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकाऱ्यांची पथके भेटी देऊन प्रत्यक्षात तोंडी तथा प्रात्यक्षिक परीक्षेची तपासणी करतील, असेही बोर्डाने नियोजन केले आहे. इयत्ता दहावी-बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार आता पूर्णपणे बंद होतील, असे नियोजन बोर्डाकडून करण्यात आले आहे. प्रात्यक्षिक परीक्षेवेळी बाह्य परीक्षकांमध्ये अदलाबदल केली जाणार आहे..

### लेखी परीक्षेतही मोठा बदल

विद्यार्थ्यांची सरमिसळ करूनही अनेक परीक्षा केंद्रांवर कॉपी केसेस सापडल्या. त्यामुळे आता यंदा प्रथमच पर्यवेक्षकांमध्येही सरमिसळ करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. याशिवाय प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत. तसेच पर्यवेक्षकांचे मोबाईल कॅमेरे पेपर सुरू झाल्यापासून संपेपर्यंत झूमद्वारे जोडले (कनेक्ट) जाणार आहेत; जेणेकरून परीक्षेतील प्रत्येक हालचाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिसणार आहे.

# ऑनलाईन कामांच्या विरोधात शिक्षकांचा राज्यव्यापी बहिष्काराचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्यातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांवर लादण्यात आलेल्या ऑनलाईन कामांच्या अतिरेकामुळे आता शिक्षक संघटना आक्रमक झाल्या असून, या जाचातून मुक्तता न मिळाल्यास राज्यव्यापी बहिष्काराचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना याबाबत सविस्तर निवेदन पाठवून आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. 'शिक्षकांना शिकवू द्या आणि विद्यार्थ्यांना शिकू द्या' अशी साद घालत, प्रशासकीय कामांसाठी शिक्षकांच्या खाजगी मोबाईलचा आणि वेळेचा होणारा गैरवापर थांबवण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केली आहे.

सध्या शाळांमध्ये शैक्षणिक कार्यापेक्षा पोर्टल, लिंक्स आणि विविध ॲप्सवर माहिती भरण्यालाच अधिक महत्त्व दिले जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. यु-डायस, शालार्थ प्रणालीपासून ते दैनंदिन पोषण आहार आणि आता विद्या समीक्षा केंद्र (व्हीएसके) अंतर्गत 'स्मार्ट उपस्थिती', चॅटबॉटवर माहिती भरण्याची सक्ती शिक्षकांसाठी असह्य झाली आहे. विशेष म्हणजे, ग्रामीण भागात इंटरनेटची सोय नसताना आणि शिक्षकांच्या खाजगी मोबाईलची साठवणूक क्षमता संपलेली असतानाही, प्रशासनाकडून ही कामे पूर्ण करण्यासाठी सतत दबाव टाकला जात आहे. यामुळे वर्गातील प्रत्यक्ष अध्यापनाचा वेळ कमी होत असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर त्याचा गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप शिक्षक समितीने केला आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत